- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४२,७०० /-
- २३ कॅरेट : १,४०,३५० /-
- चांदी : २,३६,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २२ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२३ | किंमत : २ रूपये



**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
**- दैनिक सिंहवाणी वृत्त -**
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६







# डॅशिंग देवाभाऊ !

लेखक



विनोद देशमुख
नागपूर

नागपूर शहरानं देशाला आणि महाराष्ट्राला दोन लोकनेते असे दिले, जे विकासाचा अजेंडा धडाक्यानं राबवत आहेत. पहिले, केन्द्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि दुसरे, मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस. या दोघांचा कामाचा झपाटा आणि त्यातून आलेली लोकप्रियता हा त्यांच्या राजकीय विरोधकांमध्ये दहशतीचाच विषय ठरली आहे, असं म्हणणं वावगं ठरणार नाही!

नितीन गडकरी सलग तिसऱ्यांदा केन्द्रात मंत्री आहेत, तर देवेन्द्र फडणवीस दुसऱ्यांदा, पण मधल्या पाच वर्षांच्या मध्यंतरानंतर पुन्हा, मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. मधल्या पाच वर्षातही पहिली अडीच वर्षे विरोधी पक्षनेता आणि दुसरी अडीच वर्षे उपमुख्यमंत्री ही क्रमांक दोन-तीनची पदंही तेवढ्याच क्षमतेनं सांभाळून फडणवीसांनी आपली सलग प्रशासकीय कारकीर्द कायम राखली. राज्य सरकारमधील ही तीनही उच्च पदं लागोपाठ भूषवणारे देवेन्द्र फडणवीस हे महाराष्ट्रातील एकमेव यशस्वी राजकीय नेते ठरले आहेत.

त्यांच्या राजकीय जीवनाचा चढता आलेख मी प्रारंभापासून, म्हणजे १९९२ पासून, गेले तीन तप अगदी जवळून पाहिला आहे, पाहत आहे. नागपूर मनपाचे सर्वात तरुण नगरसेवक आणि महापौर, मेयर इन कौन्सिल पद्धतीचे राज्यातील पहिले महापौर, थेट मुख्यमंत्री होणारे आमदार, उपमुख्यमंत्री, विधानसभेत विरोधी पक्षनेता अशी सर्व पदं त्यांनी लीलया सांभाळली आहेत. पण त्यांचा खरा कस लागला तो २०१९ ते २०२४ या पाच वर्षात. हा वादळी काळ समर्थपणे पार करताना 'देवेन्द्र'चं रूपांतर चक्क 'देवाभाऊ'त झालं! गेल्या १२ वर्षांच्या या 'तप'श्चर्येत यशस्वी होऊन देवेन्द्र फडणवीस आज महाराष्ट्राच्या ६६ वर्षांच्या इतिहासातील महत्त्वाचे आणि वरच्या श्रेणीचे नेते झाले आहेत, ही गोष्ट कोणीही नाकारू शकणार नाही.

२०१४ मध्ये थेट मुख्यमंत्री झालेले देवेन्द्र यांचा 'देवाभाऊ'पर्यंतचा प्रवास विलक्षण आहे. मंत्रिपदाचा कुठलाही अनुभव नसताना पहिलंच मुख्यमंत्रिपद त्यांनी ठामपणे सांभाळलं, हे उभ्या महाराष्ट्रानं अनुभवलं आहे. याकाळात वेगवेगळ्या क्षेत्रांमधील विकासकामांवर त्यांनी भर दिला. केन्द्रात गडकरी तर राज्यात फडणवीस या दोघांचीही प्रतिमा 'विकास पुरुष' अशी त्याकाळात तयार होऊ लागली. आधीची रखडलेली कामं मार्गी लावणं आणि नवी कामं हाती घेणं, अशा दोन्ही आघाड्यांवर फडणवीसांनी केलेली कामगिरी लोकांना भावली. म्हणूनच पुढच्या (२०१९) निवडणुकीतही मतदारांनी भाजपा-शिवसेना युतीला १६१ (भाजपा १०५, सेना ५६) जागांचं स्पष्ट बहुमत दिलं. ही फडणवीसांच्या यशस्वी नेतृत्वाला मिळालेली पावतीच होती.



पण, मित्रपक्ष शिवसेनेच्या उबाठानं ही पावतीच फाडून टाकली! स्वतः मुख्यमंत्री होण्याच्या लालसेपायी त्यांनी निकालानंतर युती तोडली (याच्या उलट २०१४ मध्ये निकालानंतर त्यांनीच सत्तेत येण्यासाठी भाजपाशी युती केली होती!) आणि कॉंग्रेस परिवाराशी घरठाव केला. शरद पवारांच्या इशाऱ्यावर हे घडलं, असं लोक म्हणतात,असो.

तर, निवडणुकीत युती जिंकूनही सरकार मात्र महा विकास आघाडीचं आलं! असं राजकारणात असं होतंच राहतं. पण उबाठा सत्तेत असताना विरोधकांशी (भाजपा आणि शिवसेना) सूडबुद्धीनं वागले, हे विपरीत घडलं. विरोधी पक्षनेता असलेले देवेन्द्र फडणवीस यांना कसंही करून तुरुंगात टाकण्याचा विचार करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती, असा आरोप होतो. पाव शतकाची दीर्घ नैसर्गिक युती असलेल्या जुन्या मित्राशी उबाठाचं असं वागणं कडव्या शिवसैनिकांना मात्र आवडलं नाही. त्यांनी जून २०२२ मध्ये शिवसेनेच्या इतिहासातील सर्वात मोठं बंड केलं आणि उबाठालाच खाली खेचलं! तेव्हापासून शिवसेनेत फाटाफूट जारी आहे अन् उबाठा एका छोट्या गटाचे नेते तेवढे शिल्लक आहेत. या संपूर्ण प्रकरणात देवेन्द्र फडणवीसांचा खरा कस लागला आणि त्यात ते मेरिटमध्ये उत्तीर्ण झाले. विकासाभिमुख प्रशासका बरोबरच आपण चाणाक्ष राजकारणीही आहोत, हे त्यांनी दाखवून दिले. तेव्हापासून ते देवाभाऊ झाले आहेत, देवाभाऊ !



२०१९ ते २०२२ विरोधी पक्षनेता आणि २०२२ ते २४ उपमुख्यमंत्री या पदांवर काम करताना ते शांतपणे मुत्सद्देगिरीनं वागले. पण, २०२४ मध्ये भाजपाचे आतापर्यंतचे सर्वाधिक १३२ आमदार निवडून आले, भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी (अजितदादा) या महायुतीचं मजबूत सरकार आलं अन् देवाभाऊ हळूहळू आक्रमक होऊ लागल्याचं दिसू लागलं. वास्तविक, २०१४-१९ आणि २४ या तीनही वेळचं यश त्यांच्याच नेतृत्वाखाली मिळालं, हे सर्वांनाच माहीत आहे. पण, २०२२ ते २४ याकाळात त्यांनी मविआची अशी जिरवली की देवाभाऊचे डावपेच अन् राजकीय पैलवानकी निर्विवाद सिद्ध झाली. त्यांच्या विरोधी गोटातील लोक आणि त्यांचे भाडोत्री समर्थक-प्रचारक समूह माध्यमांवर सारखी त्यांची जात काढून इतर जातींना, धर्मांना त्यांच्याविरुद्ध भडकवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या कुटुंबावर वेडीवाकडी टीकाटिप्पणी करतात.

राज्यात घडणाऱ्या कुठल्याही गोष्टीच्या अपश्रेयाची चिठ्ठी त्यांच्या नावानं फाडतात! ही सारी लक्षणं हताशपणाची आहे. "या माणसाला आवरणं कठिण आहे", या भावनेतून या प्रतिक्रिया उमटत असल्याचं स्पष्टपणे जाणवतं. देवाभाऊ आणि एकनाथ शिंदे यांच्यात बेबनाव का होत नाही, ही पोटदुखीची बिमारी तर या सर्वांना लागलेलीच दिसते! या गोष्टींना संयमानं तोंड देत देवाभाऊची वाटचाल सुरू आहे.

पण आता याचा तीव्रतेनं समाचार घेणं देवाभाऊनं सुरू केलं असल्याचं प्रकर्षानं जाणवत. या प्रतिहल्ल्यानं विरोधकही गांगरून गेल्यासारखे दिसतात. पावसाळी अधिवेशनातील विधानसभा आठवा. खोटारडेपणा, थोबाडावर टिच्चून, कोणालाही सोडणार नाही, भाडेके टट्टू, भाटक गर्दभ यासारखे शब्दप्रयोग करून देवाभाऊनं विरोधकांना गारच केलं. दस्तुरखुद्द राज ठाकरेंना ते चक्क "मिमिक्री आर्टिस्ट" म्हणाले! हे देवाभाऊचं नवं रूप आहे आणि अनेकांना ते भावलं आहे. मुळात देवाभाऊचं वागणं शांतसंयमित असल्याचं आम्ही वर्षानुवर्ष पाहत आहोत. कामात ते वाघ आहेतच. आता राजकीय डावपेचातही तरबेज झाले आहेत. त्यांच्यात वसलेला हा धडाकेबाज नेता दिवसेंदिवस वृद्धिंगत होत राहो, अशा कामनेसह आज वाढदिवसानिमित्त त्यांना लाख शुभेच्छा!

- ९८५०५८७६२२







सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, २२ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com

थोडक्यात

## किल्ले कोलार-दहेगाव रंगारी मार्गावर स्ट्रीट लाईटची मागणी, खा. बर्वे यांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

दहेगाव रंगारी येथील किल्ले कोलार ते दहेगाव रंगारी बसस्टॉप या मार्गावर तातडीने स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष( श. प.) व कॉंग्रेस पक्षाच्या वतीने रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खा.श्यामकुमार बर्वे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. किल्ले कोलार ते दहेगाव रंगारी बसस्टॉप हा मार्ग रात्री पूर्णपणे अंधारात बुडालेला असतो. त्यामुळे या मार्गावर वारंवार रस्ते अपघात घडत असून अनेकदा जनावरे वाहनांच्या धडकेत जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात. शिवाय नुकतेच काही दिवसापुर्वी अपघातात एका पायदळी जाणाऱ्याचा मृत्यु झाला होता. असे अनेक लहान मोठे अपघात घडले आहेत. यामुळे वाहनचालकांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय, सकाळी आणि सायंकाळी मॉर्निंग वॉकसाठी या मार्गाचा वापर करणाऱ्या नागरिकांनाही अंधारामुळे जीविताचा धोका निर्माण होत आहे. पुरेशा प्रकाश व्यवस्थेअभावी समाजकंटकांकडून गैरप्रकार घडण्याची शक्यता वाढत असून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी किल्ले कोलार ते दहेगाव रंगारी बसस्टॉप या संपूर्ण मार्गावर तातडीने स्ट्रीट लाईट बसविण्याच्या कामास मंजुरी देऊन संबंधित विभागाला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी खा.श्यामकुमार बर्वे यांच्याकडे करण्यात आली आहे.या मागणीमुळे परिसरातील नागरिकांना सुरक्षित प्रवास, पादचाऱ्यांना दिलासा आणि गुन्हेगारी घटनांवरही नियंत्रण मिळण्यास मदत होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस व कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. निवेदन देतांना रा.का.( शप)चे नेते चंद्रकात( गुड्डु) बोकडे, काँग्रसचे अनिल पुरी,अक्रोश देहारे, दीपक चौरे, पंकज रामेकर आदि शिष्ठमंडळाचा समावेश होता.

## एलईडी चौकात भीषण अपघात; भरधाव टाटा इंट्रा नागरिकांवर चढली, ज्येष्ठाचा मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील एलईडी चौक परिसरात मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात ६५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तीन जण जखमी झाले. टाटा इंट्रा आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमध्ये झालेल्या जोरदार धडकेनंतर हा अपघात घडला. मिळालेल्या माहितीनुसार, टाटा इंट्रा आणि एसटी बसची समोरासमोर धडक झाल्यानंतर टाटा इंट्रावरील चालकाचे नियंत्रण सुटले. अनियंत्रित झालेले वाहन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या नागरिकांवर जाऊन आदळले. या दुर्घटनेत ६५ वर्षीय ज्येष्ठाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही वाहने ताब्यात घेतली. अपघाताची नोंद करून नेमके कारण काय होते, याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# राहुल गांधी आणि प्रियांका गांधी दिल्ली पोलिसांच्या ताब्यात

### सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस स्टेशनमध्ये दाखल

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली :** राहुल गांधी यांनी काँग्रेस खासदारांसह नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या निवासस्थाना बाहेर ठिय्या आंदोलन केलं. सव्वा तीन तासांनंतर राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. दिल्ली पोलिसांनी प्रियांका गांधी यांना मंदिरमार्ग पोलीस ठाण्यात नेण्यात आलं. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना ताब्यात घेतल्यानंतर दोन तासानंतर सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस स्टेशनला पोहोचल्या आहेत. दुपारी साडेतीन वाजल्यापासून पंतप्रधान निवासस्थानाबाहेर राहुल गांधी, प्रियांका गांधी, मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह ठिय्या आंदोलन केलं होतं. तीन तासानंतर पोलिसांनी राहुल गांधी, प्रियांका गांधी यांना ताब्यात घेण्यात आलं.

**सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस स्टेशनला पोहोचल्या**

खासदार प्रियांका गांधी यांच्यासह काँग्रेस खासदारांना नवी दिल्लीतील मंदिरमार्ग पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन केल्या प्रकरणी काँग्रेस नेत्यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. काँग्रेस नेत्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीसाठी आंदोलन केले होते. पोलिसांनी काँग्रेस नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर दोन तासांचा कालावधी झाल्यानंतर सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस ठाण्यात पोहोचल्या आहेत. सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस स्टेशनसमोर पोहोचल्या आहेत. राहुल गांधी यांना छत्रसाल स्टेडियममध्ये ठेवण्यात आलं आहे. राहुल गांधी यांच्या नाकाला दुखापत झाल्याची माहिती देखील देण्यात आली आहे. त्यामुळं सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस ठाण्यबाहेर पोहोचल्या आहेत.

सोनिया गांधी मंदिरमार्ग पोलीस स्टेशनच्या बाहेर पोहोचल्या असल्या तरी त्यांना आत प्रवेश मिळालेला नाही. मंदीर मार्ग पोलीस स्टेशनच्या गेटवर त्या चर्चा करत असल्याचं पाहायला मिळालं. या पोलीस स्टेशनमध्ये प्रियांका गांधी यांच्यासह काँग्रेसचे इतर खासदार आहेत.



**सचिन पायलट काय म्हणाले ?**

पोलिसांकडून लाठीमार होणे, विद्यार्थ्यांना जखमी करणे हे कोणाला मान्य नाही. देशाच्या विरोधी पक्षनेत्यांना जबरदस्ती उचलण्यात आलं. लोककल्याणासाठी राहुल गांधी ठिय्या आंदोलन करत होते. केंद्र सरकारनं धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यायला पाहिजे होता. नीटच्या मुद्यावर संसदेत चर्चा झाली पाहिजे. संपूर्ण भारत देश नीटच्या मुद्यावर विद्यार्थ्यांसोबत आहे,असं काँग्रेस नेते सचिन पायलट म्हणाले.

शांततेमध्ये आंदोलन सुरू असताना पोलिसांनी आम्हाला अटक केली तसेच राहुल गांधी यांना सुद्धा बळजबरीने उचलून नेले, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यांचा राजीनामा घेतल्याशिवाय आता काँग्रेस स्वस्थ बसणार नाही असा इशारा काँग्रेसचे अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी दिला.

## सोनम वांगचूक यांच्याबाबत दिल्ली हायकोर्टाचा महत्त्वाचा निर्णय, मेदांता रुग्णालयात हलवण्याचे आदेश

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावरील कॉकरोच जनता पार्टी आणि नीटच्या विद्यार्थ्यांनी सुरु केलेल्या आंदोलनाचा केंद्रबिंदू असणाऱ्या सोनम वांगचूक यांच्याबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. दिल्ली पोलिसांनी शनिवारी सकाळी सोनम वांगचूक यांना बळजबरीने जंतरमंतरवरुन उचलून सफदरगंज रुग्णालयात भरती केले होते. यानंतर त्यांची पत्नी गीतांजली यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेत सोनम वांगचूक यांना खासगी रुग्णालयात हलवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती.

त्यांच्या या याचिकेवर मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. तेव्हा न्यायालयाने सोनम वांगचूक यांना डॉक्टरांच्या देखरेखीखाली दिल्लीतील मेदांता या खासगी



रुग्णालयात हलवण्याचे आदेश दिले.

सोनम वांगचूक यांच्या पत्नी गीतांजली यांनी आपल्या सरकारी यंत्रणांवर विश्वास नसल्याचे सांगत आपल्या पतीला सफदरगंज रुग्णालयातून हलवण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी केली होती. सोनम वांगचूक यांना दिल्ली पोलिसांनी सफदरगंज रुग्णालयात जबरदस्तीने आणले होते. त्यांना ज्या मजल्यावर ठेवले होते, तिथे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात होता. सोनम वांगचूक यांच्या भेटीगाठींवर निर्बंध लादण्यात आले होते. याविरोधात त्यांच्या पत्नीने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर न्यायालयाने त्यांची विनंती मान्य करत सोनम वांगचूक यांना




## अफगाणिस्तानमध्ये पावसाचे रौद्र रूप; २० जणांचा मृत्यू, ८० जखमी

वृत्तसंस्था **काबूल**

अफगाणिस्तानच्या नूरिस्तान प्रांताची राजधानी पारुनमध्ये अचानक आलेल्या महापुराने मोठे नुकसान केले आहे. उष्णतेच्या लाटेनंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे या भागात अचानक पूर आला. या घटनेत आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाला असून ८० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. तसेच १०० हून अधिक जण अद्याप बेपत्ता आहेत.

बेपत्ता झालेल्यांमध्ये महापौर आणि अनेक प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, या भागात प्रचंड नुकसान झाले आहे. खडतर आणि डोंगराळ भागात सध्या बचावकार्य वेगाने सुरू आहे. प्राथमिक अंदाजानुसार या पुरामुळे ३५ मिलियन डॉलर्स म्हणजेच जवळपास २९० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

अफगाण रेड क्रेसेंट सोसायटीकडून बाधित भागात तातडीने मदत साहित्य पोहोचवले जात आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती अधिका-यांनी व्यक्त केली आहे. या आपत्तीनंतर मानवतावादी संघटनांनी जागतिक स्तरावर मदतीचे आवाहन केले आहे. नूरिस्तान हा भाग पाकिस्तानच्या सीमेजवळ असून तो दाट जंगल, टेकड्या आणि अरुंद दऱ्यांनी वेढलेला आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वेगाने खाली येऊन पूर येतो.

# विकास ठाकरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील कोट्यवधींचा निविदा घोटाळा आणला उघडकीस !

### मंत्र्यांचे चौकशीचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, विभाग क्र. १, नागपूर येथील कोट्यवधी रुपयांच्या निविदा गैरव्यवहार, आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे केली होती. या निवेदनाची दखल घेत मंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

आमदार विकास ठाकरे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, सार्वजनिक बांधकाम विभाग, विभाग क्र. १, नागपूर येथील अभियंत्यांनी नोव्हेंबर २०२५ मधील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वकालावधीत तसेच फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या कामांचे जाणीवपूर्वक अनेक तुकडे करून विशिष्ट ठेकेदारांना कामे देणे, स्पर्धा टाळणे, इतर ठेकेदारांना निविदांची माहिती मिळू न देणे आणि शासनाच्या तिजोरीचे आर्थिक नुकसान करणे, या उद्देशाने संगनमताने कार्य केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सुमारे फ्र ३ लाखांच्या मर्यादेखाली शेकडो



निविदा जाणीवपूर्वक निश्चित करण्यात आल्या. केवळ तीन दिवसांसाठी निविदा मागविण्यात आल्या आणि निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर अवघ्या पाच दिवसांत कायार्देशही जारी करण्यात आले. तसेच, काही कामे प्रत्यक्षात न करताच संबंधित कंत्राटदारांच्या नावाने बिले काढून त्यांना देयके अदा करण्यात आली. या सर्व बाबी निविदा घोटाळ्याचे स्पष्ट पुरावे असल्याचे आमदार विकास ठाकरे यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, विभाग क्र. १ च्या अखत्यारीतील रविभवन, नागभवन, हैदराबाद हाऊस तसेच इतर शासकीय इमारतींसाठी काढण्यात आलेल्या लाकडी फ्लोअरिंग, फर्निचर, सिव्हिल रिपेअरिंग, प्लंबिंग, बोलाड्र्स बसविणे आदी कामांच्या निविदा होत. उदाहरणार्थ, रविभवन येथे सुमारे फ्र १ कोटींच्या लाकडी फ्लोअरिंगचे एकत्रित काम आवश्यक असताना ते जाणीवपूर्वक ३५ स्वतंत्र निविदांमध्ये विभागण्यात आले. प्रत्येक निविदेची किंमत सुमारे फ्र ३ लाखांच्या मयार्देखाली ठेवून निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, विभाग क्र. १ यांनी नोव्हेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या जवळपास सर्वच कामांमध्ये अशाच प्रकारच्या अनियमितता केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भातील कामाच्या आदेशांच्या प्रतीही आमदार विकास ठाकरे यांनी मंत्र्यांकडे सादर केल्या.

आमदार विकास ठाकरे यांनी संबंधित अभियंत्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करणे, मागील सात वर्षांतील सर्व प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, देयके आणि गुणवत्ता तपासणी अहवालांचे स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक लेखापरीक्षण करणे, प्रत्येक कामाची प्रत्यक्ष स्थळपाहणी करणे तसेच दोषी अधिकारी, कर्मचारी व ठेकेदारांविरुद्ध फौजदारी कारवाई करून शासनाच्या नुकसानीची वसुली करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाची गंभीर दखल घेत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

# देवेंद्र फडणवीस यांची राजकीय आणि प्रशासकीय कारकीर्द

देवेंद्र गंगाधरराव फडणवीस हे भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेते आहेत. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता ते नेत्यांचे नेते असल्याचे दिसून येते. याविषयीची मते अनेक राजकीय तज्ज्ञांनी मांडली आहेत. नेत्यांचे नेते म्हणत असताना त्यांचा राजकीय आवाका, राजकारणातील डावपेच, राजकारणाचा समाजाच्या उत्कर्षासाठी केलेला उपयोग, त्याचबरोबर त्यांचे राजकीय पक्षांपलिकडे असलेले संबंध तितकेच महत्त्वाचे आहेत. म्हणूनच आज ते महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रभावशाली व्यक्तिमत्व बनले आहेत. त्यांनी अत्यंत तरुण वयात राजकारणात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांनी एक-एक टप्पा गाठत राज्याच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत मजल मारली आहे. ही मजल फक्त पदापर्यंत मर्यादित नाही. तर त्यांनी त्या पदावर असताना केलेला विकास आणि बदल कोणीही विसरू शकणार नाही. तर आज आपण त्यांचा राजकीय आणि प्रशासकीय प्रवास जाणून घेणार आहोत.

नागपूरमधील प्रतिष्ठित कुटुंबात जन्मलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून राजकीय कारकीर्द सुरू केली. १९९२ ला नगरसेवक आणि १९९७ ला नागपूरचे महापौर पद मिळवले. त्यानंतर १९९९ मध्ये ते पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. त्यानंतर सलग ते ६ टर्म आमदार म्हणून निवडून येत आहेत. यादरम्यान, त्यांनी विविध पदांवर काम करत महाराष्ट्रात भाजपाच्या वाढीसाठी मोठा वाटा उचलला आहे. २०१४ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा कार्यकाल हा महाराष्ट्राच्या बदलाचा काळ ठरला. त्यानंतर त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, जलसंपदा मंत्री, अर्थमंत्री अशी विविध पदे भूषवत महाराष्ट्राच्या विकासासाठी जोमाने काम केले. सध्या ते तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत.

**१९८७- सामाजिक कार्याला सुरूवात**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम सुरू केले. त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक म्हणून विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

**१९८९- भारतीय जनता युवा मोर्चाच्या वॉर्ड अध्यक्षपदी निवड**

देवेंद्र फडणवीस यांची १९८९ मध्ये भारतीय जनता युवा मोर्चाच्या धरमपेठ वॉर्ड अध्यक्षपदी निवड झाली. हा त्यांचा राजकारणातील प्रारंभिक टप्पा होता. या निवडीनंतर त्यांनी स्थानिक पातळीवर पक्षाच्या कार्याची जबाबदारी हाती घेतली. या काळात त्यांनी स्थानिक तरुणांना भाजपच्या विचारधारेत सामील करून घेतले आणि पक्ष संघटनेला बळकट करण्याचे कार्य सुरू केले. त्याचबरोबर त्यांनी वॉर्डमधील विविध सामाजिक आणि राजकीय

लेखक

राजु फुंडे
सालेकसा, जि. गोंदिया

कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

**१९९०- नागपूर पश्चिम मतदारसंघाच्या पदाधिकारी पदावर नियुक्ती**

१९९० मध्ये, नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, प्रसिद्धी प्रमुख म्हणून काम करताना देवेंद्र फडणवीस यांनी मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यावर भर दिला. तसेच विविध सरकारी योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात सहकार्य केले. याच काळात त्यांचे प्रत्यक्ष ग्राऊंडवर, राजकारण आणि समाजकारण करणाऱ्या नेत्यांशी, पदाधिकाऱ्यांशी संबंध आला. त्यातून त्यांनी पक्षसंघटनेचे कार्य मजबूत करण्यावर भर दिला.

**३० ऑक्टोबर १९९०- पहिली कारसेवा आणि १५ दिवसांचा तुरूंगवास**

कॉलेजमध्ये असताना अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सक्रिय असताना वयाच्या २० व्या वर्षी ३० ऑक्टोबर १९९० मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी पहिली कारसेवा केली होती. त्यावेळी त्यांनी नागपूरहून ट्रेनने प्रयागराज (इलाहाबाद) गाठले होते. ते आणि त्यांचे सहकारी कार्यक्रमाच्या किमान एक आठवडाभर आधीच पोहोचले तिथे पोहचले होते. पण त्या सरकारने तिथे जाणारे सर्व रस्ते बंद करून टाकले होते. तरीही देवेंद्रजी इतरांसोबत आयोध्येला पायी निघाले. त्यावेळी पोलिसांनी हवेत गोळीबार करत, लाठीमार गर्दीला थांबवण्याचा प्रयत्न केला. त्या सर्वांना पकडून बदायूच्या सेंट्रल जेलमध्ये टाकण्यात आले. ते तिथे जवळपास ते १४ ते १५ दिवस सेंट्रल जेलमध्ये होते.

**१९९२- नागपूर भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष**

१९९२ मध्ये नागपूर शहराच्या भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली. या पदावर असताना त्यांनी युवकांमध्ये राष्ट्रवाद, सुशासन आणि पक्ष कार्यामध्ये सक्रिय सहभाग यावर भर दिला. नागपूर शहरात विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे त्यांनी युवांना राजकारणात आणण्याचे काम केले.

**२१व्या वर्षी नगरसेवक म्हणून निवड**

देवेंद्र फडणवीस यांनी १९९२ मध्ये वयाच्या २१व्या वर्षी पहिल्यांदा नागपूर महानगरपालिकेतून नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली होती. नागपूर महापालिकेच्या राम नगर वॉर्डमधून त्यांनी ही निवडणूक लढली होती. त्यात ते विजयी झाले होते.

**१९९४- भारतीय जनता युवा मोर्चा राज्य उपाध्यक्ष**

१९९४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांची भाजप युवा मोर्चाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली. या भूमिकेत त्यांनी राज्यभर दौरे करून युवकांशी थेट संवाद साधला व संघटनेचे जाळे अधिक मजबूत केले. राज्य पातळीवरील ही जबाबदारी त्यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली.

**१९९७- दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवड**

१९९२ मध्ये लढवलेल्या पहिल्या निवडणुकीचा कालावधी संपल्यानंतर ते पुन्हा रामनगर वॉर्डमधून निवडणुकीसाठी उभे राहिले आणि जिंकूनही आले. पहिल्या टर्ममध्ये त्यांनी नगरसेवक पदाची जबाबदारी आणि महापालिकेची कार्यपद्धती समजून घेतली होती. त्यामुळे दुसऱ्या टर्ममध्ये त्यांना त्याचा खूप फायदा झाला. महानगरपालिकेचे काम कशाप्रकारे पुढे जाते. याची इत्यंभूत माहिती त्यांना झाली होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या वॉर्डमधील अनेक कामे दलालांच्या हस्तक्षेपाशिवाय पूर्ण केली.

**५ मार्च १९९७- नागपूर महापौरपदी निवड; शहरातील महत्त्वाच्या समस्यांवर केले काम!**

देवेंद्र फडणवीस वयाच्या २७ व्या वर्षी नागपूर महानगरपालिकेचे महापौर झाले. ते भारतातील दुसरे सर्वात तरुण महापौर ठरले आहेत. त्यांनी ५ मार्च १९९७ ते ६ फेब्रुवारी १९९८ आणि ७ फेब्रुवारी १९९८ ते ४ फेब्रुवारी १९९९ असे सलग दोन वर्षे नागपूरचे महापौर पद भूषवले. महापौर असताना देवेंद्र फडणवीस यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांवर काम केले. शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी पेंच पाणी पुरवठा योजना राबवून नागपूरला टँकरमुक्त केले. त्याचबरोबर शहरातील ऑक्टराय व्यवस्थेमध्ये महत्त्वाचे बदल करून, सर्वसामान्य नागरिक आणि व्यापाऱ्यांवर पडणारा कराचा बोजा कमी केला. नागपूर शहराच्या विकासासाठी त्यांनी निधी उभारण्यावर भर दिला. मालमत्ता कर थकवणाऱ्या घर मालकांकडून दुप्पट कर वसुल करण्याचा निर्णय राबवला. परिणामी नागपूर महानगरपालिकेच्या तिजोरीत त्यावेळी ३५ कोटी रुपयांचा निधी जमा झाला होता. देवेंद्रजी जेव्हा नागपूरचे महापौर म्हणून कार्यरत होते. तेव्हा ते महाराष्ट्राच्या महापौर समितीचे अध्यक्ष म्हणूनही निवडून आले होते.

**१९९८- मेअर इन काऊन्सिल: महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड**

१९९८ मध्ये मेअर इन काऊन्सिल पद्धती अंतर्गत देवेंद्र फडणवीस यांची महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड झाली



आहे. मेअर इन काऊन्सिल पद्धत ही महानगरपालिका प्रशासनातील एक पद्धत आहे. ज्यात महापौर हा नगरपालिकेच्या कार्यकारी प्रमुखाच्या भूमिकेत असतो आणि त्याच्या नेतृत्वाखाली एक सल्लागार मंडळ किंवा काऊन्सिल असते. मेअर इन काऊन्सिल या पद्धतीत महापौर हे कार्यकारी अधिकार असलेले प्रमुख असतात. महापौरच्या नेतृत्वाखाली काही नगरसेवकांची एक समिती असते. ज्याला काऊन्सिल म्हणतात. या सदस्यांकडे विशिष्ट विभागांची जसे की, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आदींची जबाबदार दिलेली असते.

**७ ऑक्टोबर १९९९- विधानसभा निवडणूक १९९९: ९ हजार मतांनी आमदार म्हणून पहिला विजय**

१९९९ मध्ये देवेंद्रजी पहिल्यांदा आमदार झाले. १९९९ मध्ये देवेंद्रजींनी आमदार म्हणून २१ ऑक्टोबर रोजी विधानसभेत सदस्यत्वाची शपथ घेतली होती. विधिमंडळात त्यांनी नागपूर पश्चिम या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. आमदार झाल्यानंतर त्यांचे कार्यक्षेत्र वाढले. त्याचबरोबर कामाचे स्वरूप देखील बदलले. विधानसभेच्या या पहिल्याच निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांना ९४,८५३ मते मिळाली. त्यांचा ९,०८७ मतांनी विजय झाला. त्यांना मिळालेल्या मतांची टक्केवारी ४८.६६ टक्के इतकी होती. या मतदारसंघात मतदारांची एकूण संख्या ३,९९,१९५ इतकी होती. त्यातील १,९८,८४३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. नागपूर पश्चिम मतदारसंघातून १९९९ मध्ये एकूण ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.

**१६ डिसेंबर १९९९- विधिमंडळात पहिले आक्रमक आणि अभ्यासू भाषण**

आमदार झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी १६ डिसेंबर १९९९ रोजी हिवाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळात पहिले भाषण केले. विरोधी पक्ष नेत्यांनी कापसाच्या संदर्भात जो ठराव मांडला होता. त्याला समर्थन देत त्यावर त्यांनी आपले मत व्यक्त केले होते. या पहिल्याच भाषणातून देवेंद्रजींनी आपल्या अभ्यासूपणाची चुणूक दाखवली होती. विदर्भातील शेतकऱ्यांच्या मालाला सरकारने जो दर जाहीर केला होता. त्यानुसार त्याला भाव दिलाच जात नाही. हे सांगताना देवेंद्रजींनी शेती उत्पादनावर लावली जाणारी एम्पोर्ट ड्युटी, एक्स्पोर्ट सबसडी याचा आढावा घेत इतर पिके जसे की, ऊस आणि त्यापासून बनवण्यात येणारी साखर यांना कसे संरक्षण मिळते. तसेच विदर्भातील कापसाच्या पिकाला संरक्षण का दिले जात नाही. याबाबत त्यांनी सरकारला जाब विचारला होता. कापूस एकाधिकार योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर ताण येत असला तरी, या योजनेमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे, याची सरकारला जाणीव करून दिली. त्याचबरोबर पणन महासंघाने कशाप्रकारे काम केले पाहिजे, यावर काही सूचना मांडल्या. अशाप्रकारे देवेंद्रजींनी आपल्या भागाचे लोकप्रतिनिधित्व करताना शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आपल्या पहिल्याच भाषणात मुद्देसूद आणि अभ्यासू मांडणी करून सरकारकडे न्यायाची मागणी केली होती.

**२० डिसेंबर १९९९- पूरक मागण्यांवरील चर्चेतून झोपडपट्टी आणि मालकी हक्क पट्ट्यांबाबत सरकारचे वेधले लक्ष**

देवेंद्र फडणवीस यांनी १९९९-२००० अर्थसंकल्पावरील गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या पूरक मागण्यांवर २० डिसेंबर १९९९ रोजी झालेल्या चर्चेत सहभागी होत झोपडपट्टी आणि त्यांच्या मालकी हक्क पट्ट्यांबाबत ठामपणे आपले विचार मांडले होते. राज्यातील झोपडपट्ट्या आणि त्यांना दिल्या जाणाऱ्या मालकी हक्काच्या पट्ट्यांवर चर्चा करताना त्यांनी मुंबई वगळता नागपूर, पुणे इतर जिल्ह्यातील झोपडपट्ट्यांबाबातही चर्चा केली. ही चर्चा करत असताना त्यांनी १९९९ पर्यंतच्या राज्यातील सर्व झोपडपट्ट्यांना सरकारने संरक्षण द्यावे, अशी मागणी केली होती.

**२००१- भारतीय जनता युवा मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष**

२००१ मध्ये, देवेंद्र फडणवीस यांची भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली. हे पद मिळवणारे ते महाराष्ट्रातून सर्वात तरुण युवक होते. राष्ट्रीय स्तरावर त्यांनी पक्षाचे धोरण युवकांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. त्यांच्या ओघवत्या वक्तृत्वामुळे युवा पिढीमध्ये जागरूकता निर्माण झाली.

**२००३- राष्ट्रकुल संसदीय मंडळ: महाराष्ट्र विधानसभेचा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्राप्त**

२००३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांना विधानसभेतील प्रभावी सहभाग, अभ्यासपूर्ण मते आणि लोकहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडल्याबद्दल मिळाला. त्यांच्या राजकीय कारकिदीर्तील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. राष्ट्रकुल संसदीय मंडळाची स्थापना सन १९११ मध्ये एम्पायर पार्लमेंटरी असोसिएशन या नावाने प्रथम इंग्लंडमध्ये झाली. सुरुवातीला या मंडळाचे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यू फाऊंडलंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका व युनायटेड किंग्डम हे देश सदस्य होते. या मंडळाने १९४८ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ असे नाव बदलून घेतले. राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे एकूण ५४ देशांतील सुमारे १७ हजारांपेक्षा जास्त संसद, विधानमंडळ सदस्य सभासद आहेत. या मंडळाच्या मदतीने विविध देशातील संसदीय कार्यप्रणालींच्या माहितीचे आदान-प्रदान होते.

**१६ ऑक्टोबर २००४- विधानसभा निवडणूक २००४: दुसऱ्या टर्ममध्ये मागच्या तुलनेत दुप्पट मतांनी विजय**

२००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नागपूर पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांनी मागील टर्मच्या तुलनेत या टर्ममध्ये दुप्पट मार्जिनने ही निवडणूक जिंकली होती. १३ ऑक्टोबर २००४ रोजी झालेल्या निवडणुकीचा निकाल १६ ऑक्टोबर २००४ रोजी जाहीर झाला. नागपूर पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकूण १९ उमेदवार रिंगणात होते. या मतदारसंघात एकूण ४ लाख ४४ हजार ८४६ मतदार होते. त्यातील २ लाख ३२ हजार ६१८ मतदारांनी मतदान केले. त्यातील १ लाख १३ हजार १४३ मते देवेंद्र फडणवीस यांना मिळाली. ते या निवडणुकीत १७,६१० मतांच्या फरकाने जिंकले होते.

**२२ ऑक्टोबर २००९- विधानसभा निवडणूक २००९: मतदारसंघ पुनर्रचनेनंतरही दणदणीत विजय**

२००९ मध्ये निवडणूक आयोगाने मतदारसंघांची पुनर्रचना केली. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांना त्यांचा नागपूर पश्चिम हा मतदारसंघ सोडावा लागला. त्यांनी नागपूर-दक्षिण पश्चिम या मतदारसंघातून निवडणूक लढवली. या निवडणुकीत त्यांनी २७,७७५ मतांचे लीड मिळवून विजय मिळवला होता. ही निवडणूक १३ ऑक्टोबर २००९ रोजी झाली होती. त्याचा निकाल २२ ऑक्टोबर २००९ रोजी जाहीर झाला. या मतदारसंघातून एकूण १५ उमेदवार रिंगणात उभे होते. तर मतदारसंघात एकूण ३ लाख ५० हजार ६७१ मतदार होते. त्यापैकी १ लाख ७४ हजार ६४९ मतदारांनी मतदान केले. त्यातील



८९,२५८ मते देवेंद्र फडणवीस यांना मिळाली. त्यांनी विरोधी पक्षातील उमेदवाराचा २७,७७५ मतांनी पराभव करून विजय मिळवला होता. हा विजय उमेदवाराचे प्रभावी नेतृत्व, कामाचा झपाटा आणि मतदारांचा विश्वास दर्शवणारा होता. या निवडणुकीने नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात नवी राजकीय दिशा ठरली आणि विकासासाठी नवे मार्ग मोकळे झाले.

**२०१०- सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र**

देवेंद्र फडणवीस यांची २०१० मध्ये भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्त झाल्यानंतर, त्यांनी पक्षाच्या संघटनात्मक कामकाजात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या काळात त्यांनी विविध आंदोलने केली. तसेच संघटनात्मक कौशल्याच्या जोरावर पक्षाने दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडली. यादरम्यानच्या काळात त्यांनी, वंचित समाजातील वालिमिकी, सुदर्शन, माहियार आदी समाजातील लोकांसाठी आंदोलने करून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी २००८ मध्ये जनता दरबार हा उपक्रम सुरू केला होता. त्याचे कामही या कालावधीत वाढले होते. लोकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यावर त्यांचा सर्वाधिक भर होता.

**११ एप्रिल २०१३- महाराष्ट्राच्या प्रदेशाध्यक्षपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतूत्वाने ११ एप्रिल २०१३ रोजी देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड केली. या निवडीनंतर राज्यात होऊ घातलेल्या आगामी विधानसभेच्या निवडणुका देखील त्यांच्याच नेतृत्वाखाली लढवल्या जातील, हे निश्चित झाले होते. दरम्यान, या काळात त्यांनी सर्व विरोधकांना एकत्र करून सत्ताधाऱ्यांना पायउतार करण्याचा विडा उचलला होता. २०१४ च्या निवडणुका लक्षात घेऊन त्यांनी सर्व विरोधकांची मोट देखील बांधली होती. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल करत जलसंपदा विभागातील घोटाळा चव्हाट्यावर आणला होता. या काळात त्यांनी सिंचन घोटाळ्याची काळी पत्रिका प्रसिद्ध करून घोटाळ्यातील अनेक गोष्टी बाहेर आणल्या होत्या. रस्त्यावरील आंदोलनाबरोबर देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सत्ताधाऱ्यांना चांगलेच कात्रीत पकडले होते.

**- तालुका प्रतिनिधी, दै. सिंहवाणी वृत्त**

# ५० वर्षानंतर महसूल विभागाच्या सेवाप्रवेश नियमांना नवी दिशा

## महसूल अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा, डीपीडीसीबाबत शहर आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र बैठका

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या आस्थापनेचा नवीन आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियम (रिक्रूटमेंट रुल्स - आरआर) लागू करण्यासाठी सोमवारी अधिसूचना जारी करण्यात आली असून, तब्बल ५० वर्षानंतर महसूल विभागाच्या रचनेत ऐतिहासिक बदल होत असल्याची माहिती महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.१९७७ नंतर प्रथमच महसूल विभागाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल करण्यात येत असून, राज्य मंत्रिमंडळाने नवीन आकृतीबंध आणि भरती नियम (आरआर)ला मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रस्तावास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे नायब तहसीलदार ते अप्पर जिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्यांच्या पदोन्नती आणि भरती प्रक्रियेतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागतील. महसूल अधिकाऱ्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असून, यामुळे विभागातील अधिकाऱ्यांना मोठी सुलभता मिळणार असल्याचे सांगत त्यांनी सर्व



महसूल अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**शहर व ग्रामीण भागाच्या स्वतंत्र बैठका**

नागपूर जिल्हा नियोजन समितीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, शहरातील आमदारांकडून नागपूर शहरासाठी स्वतंत्र जिल्हा नियोजन समितीची मागणी करण्यात आली आहे. एका जिल्ह्यासाठी दोन डीपीडीसी स्थापन करणे शक्य नसले तरी शहरासाठी स्वतंत्र लघुगट तयार करण्यात आला असून, शहर आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र बैठका घेण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**एसआरए प्रकरणातील तक्रारींची होणार चौकशी**

एसआरएतील अधिकारी आणि एफएसआय घोटाळ्याच्या आरोपांबाबत विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांबाबत तक्रारी आल्यास त्यांची चौकशी केली जाईल. नगरविकास विभागाशी संबंधित तक्रारींची चौकशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करतील, तर महसूल विभागाशी संबंधित बाबींची चौकशी स्वतः आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर निश्चित कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**तथ्यही लक्षात घेतले पाहिजे**

राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या टीकेबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, देशातील १४० कोटी जनतेने नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची जबाबदारी दिली आहे. विरोधकांनी सरकारवर टीका करणे हा लोकशाहीचा भाग असला तरी तथ्यही लक्षात घेतले पाहिजे.

**जनतेची दिशाभूल करण्यासाठी आंदोलन**

नीट परीक्षा प्रकरणाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, पेपरफुटीची घटना निषेधार्ह होती. मात्र, तो सरकारचा दोष नव्हता. व्यवस्थेतील काही त्रुटी सरकारने वेळीच दुरुस्त केल्या असून, संपूर्ण प्रकरणात सरकारने स्वतःहून कारवाई केली आहे.

जंतर-मंतरवरील आंदोलनाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, हे आंदोलन जनतेची दिशाभूल करण्यासाठी आणि तरुणांना भडकविण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे. आंदोलनस्थळी दगडफेकीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात दगड आणण्यात आल्याची माहिती असून, यामागील हेतू आणि संबंधित असामाजिक तत्त्वांची सरकारकडून चौकशी सुरू आहे. सरकारला जाणीवपूर्वक बदनाम करण्याचा आणि जनतेमध्ये अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

---

थोडक्यात

## लेखकाने व्यासपीठावर बोलावली कथेची नायिका



**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

सर, 'शुभ्राची परसबाग'मधली शुभ्रा खरेच आहे का? इयत्ता तिसरीतील एका चिमुकलीने निरागसपणे विचारलेला हा प्रश्न आणि त्यानंतर लेखक संजय ऐलवाड यांनी दिलेले उत्तर संपूर्ण सभागृहासाठी अविस्मरणीय ठरले. हो... शुभ्रा खरोखरच आहे आणि ती रोज तुमच्यासोबत याच शाळेत शिकते, या प्रश्नाने विद्यार्थी अश्चर्यचकीत झाले. आणि त्यानंतर क्षणात कथेची नायिका व्यासपीठावर उभी राहिली. तीला पाहताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. आणि आनंदाने भारावलेल्या विद्यार्थ्यांनी तिचे उत्स्फूर्त स्वागत केले. एमआयटीच्या श्री शारदा प्राथमिक विद्यालयात आयोजित 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमात बालभारतीच्या इयत्ता तिसरीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'शुभ्राची परसबाग' या कथेचे लेखक, बालसाहित्यिक संजय ऐलवाड यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विशेष म्हणजे, 'शुभ्राची परसबाग' या कथेची प्रेरणा ठरलेली शुभ्रा ही याच शाळेतील इयत्ता तिसरीची विद्यार्थिनी असल्याचे लेखकांनी सांगताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आश्चर्य आणि आनंद पाहण्यासारखा होता. पुस्तकातील नायिका आपल्या वर्गातच शिकत असल्याचे समजताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात तिचे स्वागत केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी लेखकांची मुलाखत घेत लेखनाची प्रेरणा, कथा कशा सुचतात, पहिले साहित्य कोणते, पत्रकारितेत कसे आलात, पत्रकारितेतील संस्मरणीय अनुभव कोणते अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती केली. लेखकांनी प्रत्येक प्रश्नाला विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या, खेळकर आणि प्रेरणादायी भाषेत उत्तरे दिली. यानंतर त्यांनी 'भित्रा थेंब' ही विज्ञानवादी कथा सांगितली. कथाकथनातील जिवंत शैलीमुळे विद्यार्थी कथेत रंगून गेले आणि कथा संपताच सभागृह टाळ्यांच्या कडकडाट झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका नीलम वाघ होत्या. प्रयोगशिल शिक्षिका मनीषा बुंदे, सेवानिवृत्त शिक्षक अनंत कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिक्षिका आशा पालवे, आशा तिकोणे, अंकिता मुसळे, रेखा देवरे आदी उपस्थित होत्या. नीलम वाघ यांनी प्रास्ताविक केले. अशा पालवे यांनी लेखकांचा परिचय करून दिला. आशा त्रिकोणी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. अंकिता मुसळे यांनी सूत्रसंचालन केले.

---

## शाळाबाह्य बालकांचा शोध अभियानाला वेगए बाबाटोली (सालेकसा) येथे अधिकाऱ्यांची संयुक्त भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

शाळाबाह्य बालकांचा शोध मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी दि. २१ जुलै रोजी बाबाटोली (सालेकसा) वस्तीला महसूल व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त भेट देत पालकांशी संवाद साधला. यावेळी शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण, पालकांचे समुपदेशन तसेच वयानुरूप मुलांना तात्काळ जवळच्या शाळेत प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात आली. या भेटीदरम्यान सालेकसा तालुक्याचे तहसीलदार एन. एम. कोंडागुर्ले, नायब तहसीलदार कु. ए. ए. सुतार, नगरसेवक राजेंद्र बडोले, शिक्षण विस्तार अधिकारी आर. एच. रहांगडाले, रोंढा केंद्रप्रमुख कु. एस. एस. पाचे, सालेकसा केंद्रप्रमुख विकास लंजे, तालुका बालरक्षक कु. ए. एस. माने, विशेष शिक्षक टी. डी. बघेले, पी. एम. बोन्दरे, एस. आर. राऊत, कु. सुप्रिम तांदळे, श्री. सोयाम, श्री. रामटेके, श्री. कावळे तसेच पंचायत समिती सालेकसा शिक्षण विभागाचे कनिष्ठ सहायक उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी उपस्थित पालकांना शिक्षणाचे महत्त्व, शाळाबाह्य राहण्याचे दुष्परिणाम आणि प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. समुपदेशनानंतर अनेक वयानुरूप बालकांना जवळच्या शाळांमध्ये दाखल करण्यात आले. यावेळी तहसीलदार कोंडागुर्ले व नायब तहसीलदार कु. सुतार यांनी इयत्ता दहावीची बोर्ड परीक्षा न देता शिक्षण खंडित झालेल्या विद्यार्थ्यांनी नमुना क्र. १७ भरून पुन्हा शिक्षण सुरू ठेवावे, असे आवाहन केले. तसेच पालकांच्या विविध समस्या ऐकून संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांचे समाधान करण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. "एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये" या उद्देशाने प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, पालकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे यावेळी दिसून आले.

---

## 'आशादीप'चा ३३ वा वर्धापन दिन समारोह २५ जुलै रोजी

### दृष्टीहिन धावपटू मनीषा बागडे व जलतरणपटू ईश्वरी पांडे यांचा होणार सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** आशादीप अपंग, महिला-बाल विकास संस्था, नागपूरच्या ३३ व्या वर्धापन दिन समारोहाचे शनिवार, २५ जुलै रोजी दुपारी ३.०० वाजता सीताबर्डी येथील मातृसेवा संघाच्या रंजन सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून नागपूर म. न. पा. स्थायी समिती सभापती शिवानी दाणी राहणार असून विशेष अतिथी म्हणून सन एनवायरो टेक्नॉलॉजी प्रा. लि. चे संस्थापक-संचालक उत्कर्ष खोपकर तसेच मातृसेवा संघाच्या सचिव डॉ. लता देशमुख उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लालासाहेब पाटील राहणार आहेत.

यावेळी स्व. उषाताई संत पुरस्कार - २०२६ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दृष्टिहीन धावपटू मनीषा कडूकार बागडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, पाल्क समुद्रधुनी यशस्वीपणे पोहून विक्रमी कामगिरी करणाऱ्या अंध जलतरणपटू ईश्वरी पांडे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. याशिवाय संस्थेच्या ई-नियतकालिकाचे विमोचन यावेळी होईल. या वर्धापन दिन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा शास्त्री आणि सचिव अपर्णा कुळकर्णी यांनी केले आहे.

---

## किरण मिडब्रेन अकादमीतर्फे २९ इंडिया वर्ल्ड रेकॉर्डधारक विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

किरण मिडब्रेन अकादमीतर्फे ब्लाइंडफोल्ड (डोळ्यांवर पट्टी बांधून) विविध ओळख कौशल्यांमध्ये इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करणाऱ्या २९ विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या असामान्य कौशल्यांचा गौरव करत त्यांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. अकादमीचे संस्थापक डॉ. किरण काकडे यांच्या मार्गदर्शनात ध्यान, योग, एकाग्रता आणि व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित विशेष प्रशिक्षण दिले जाते.




या प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमता जागृत करून त्यांच्यात स्मरणशक्ती, निरीक्षणशक्ती, आत्मविश्वास आणि मानसिक एकाग्रता विकसित करण्याचे कार्य अकादमीकडून सातत्याने केले जात आहे. या सत्कार सोहळ्यास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्रीमंत मुधोजी महाराज भोसले, मुस्ताक पठाण आणि डॉ. सुलक्षणा भुयार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी लेख काकडे, श्राविका बागडे, अन्विका बागडे, अन्विका मेश्राम, गोजिरी निनावे, अर्जुन दाभाडे, आर्यन रोकडे, कर्तव्य काकडे, श्री डुकरे, ताशी पानतावणे, ओवी फाये, अभिराज पाझरे, देवांश कलंत्री, निवी निम्बार्ते, शिव पजाई, देवयानी दानव, हृदय सातपैसे, सानवी वर्मा, नक्श लाम्बे, युगांत वंजारी, विहान जिवने, विनमयी चकोले, भार्गव तुळकाने, खुश धुवाविया, भाव्या बोकडे, आरोह मते, अरहंत थूल, निर्भय एंचिलवार आणि तोशनव डोये या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाचे कौतुक करत किरण मिडब्रेन अकादमीच्या ध्यान, योग आणि एकाग्रतेवर आधारित प्रशिक्षण पद्धतीचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्मरणशक्ती, एकाग्रता आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत असून भविष्यातही अशा गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

---

## वांगचूक यांच्या आंदोलनाला भिवापूरचा पाठिंबा

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर निदर्शने



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा दर्शवित भिवापूर येथे सोमवारी शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर कार्यकर्त्यांनी तहसील प्रशासनाला निवेदन सादर करून आपल्या मागण्यांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली. तहसील कार्यालय परिसरात झालेल्या या आंदोलनात सुमारे ५० ते ६० कार्यकर्ते सहभागी झाले होते. निदर्शने शांततेत पार पडली. त्यानंतर नायब तहसीलदार श्रीमती निकम यांना निवेदन देण्यात आले.

आंदोलनात काँग्रेसचे माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर डडमल, लव जनबंधू, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चे नगरसेवक कैलाश कोमरेल्लीवार, नगरसेविका किरण नागरिकर, वर्षा ठाकरे, मीनाक्षी उमरेडकर, मंजुषा समर्थ, निशा जांभुळे, मंगला पांडे, संयोजिता बांबोटे, उर्मिला ढोक, बहुजन समाज पक्षाचे शहराध्यक्ष बळवंत जांभुळकर, वसंत खवास, शिवसेना (शिंदे)चे महेश डडमल यांच्यासह विद्यार्थी, युवक व नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी तहसील कार्यालय परिसरात चोख बंदोबस्त ठेवला होता.

## बेस्ट कर्मचाऱ्यांचा पुन्हा एल्गार!

**वृत्तसंस्था, मुंबई**

बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने पुन्हा एकदा संपाचा इशारा दिला आहे. १५ ऑगस्टपर्यंत प्रमुख मागण्यांवर निर्णय न झाल्यास कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात २१ जून रोजी झालेल्या वेतन कराराचा फेरविचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांशी चर्चा न करता हा करार करण्यात आल्याने अनेक प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप कृती समितीने केला आहे. सुधारित वेतनश्रेणी, महापालिका कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व सेवा-शर्ती, तोट्यातील बेस्ट उपक्रमाला आर्थिक मदत, प्रलंबित वेतन कराराची अंमलबजावणी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी 'समान काम, समान दाम' या प्रमुख मागण्या समितीने मांडल्या आहेत. तसेच, १५ ऑगस्टपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास बेस्ट कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप होणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

---

## वृत्तवेध सुलेखन स्पर्धा पुरस्कार वितरण संपन्न

**योगिता ठाकरे- पल्लवी अंबरते अव्वल, यशवंतराव चव्हाण सेंटर आणि वेध प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विद्यार्थ्यांमध्ये वृत्तपत्र वाचनाची वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच सुलेखनाचे संस्कार रुजावेत या उद्देशाने यशवंतराव चव्हाण सेंटर जिल्हा केंद्र नागपूर आणि वेध प्रतिष्ठान नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मे ते १५ जून या कालावधीत घेण्यात आलेल्या वृत्तवेध सुलेखन स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सभागृह येथे थाटात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंटपॉल स्कूलचे संचालक तथा यशवंतराव चव्हाण सेंटरचे उपाध्यक्ष डॉ. राजाभाऊ टांकसाळे होते. ज्येष्ठ पत्रकार तथा सुप्रसिद्ध लेखक अविनाश महालक्ष्मे यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरित करण्यात आले. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष महेश बंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्याचे अभ्यासाक ज्ञानेश्वर रक्षक, वेध प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ मनोहर नरांजे, विदर्भ साहित्य संघाचे सदस्य अनिल इंदाने, रेखा दंडीगे - घिया, यशवंतराव चव्हाण सेंटरचे सदस्य रवी देशमुख, शशिकांत मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते.

ही स्पर्धा वर्ग ५ ते ८ आणि वर्ग ९ ते १२ या गटात आयोजित करण्यात आली होती तरी वर्ग १ ते ४ च्या विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजाभाऊ टांकसाळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की संगणकीय युगात लेखनाचे महत्व कमी होत चालले१ असले तरी लेखनाने अभ्यासाचे दृढीकरण होत असते. म्हणून विद्यार्थ्यांनी लेखनाचा सातत्याने सराव करावा.

वृत्तपत्र वाचनाचे महत्त्व अधोरेखित करतांना अविनाश महालक्ष्मे म्हणाले की सोशल मीडियामुळे दिवसेंदिवस वृत्तपत्र वाचनाची आवड कमी होत आहे. वृत्तपत्र वाचनाने जागतिक घडामोडींची माहिती तर मिळतेच. त्यासोबतच समाजभानसुध्दा विकसित होते. या पार्श्वभूमीवर ही स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पर्धा संयोजक खुशाल कापसे यांनी, स्वागतपर मनोगत महेश बंग, प्रास्ताविक डॉ. मनोहर नरांजे यांनी तर आभारप्रदर्शन शशिकांत मोहिते यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसंत गोमासे, ओंकार पाटील, शंकर जीवनकर, कृष्णा चावके, डॉ. अश्विन किनारकर, डॉ. शिल्पा सूर्यवंशी, वासंती गोमासे, डॉ. अश्विनी देहाडराय, नंदा गिरडकर, कांचन मेश्राम यांनी परिश्रम घेतलेत .

**हे आहेत पुरस्कारप्राप्त विद्यार्थी**

गट अ - वर्ग ५ ते ८

प्रथम - पल्लवी शलिक अंबरते ( जि. प. प्राथमिक शाळा तिडंगी )

द्वितीय - चेतन सुरेश अंबरते ( जि. प. उच्च प्राथमिक शाळा तिडंगी )

तृतीय - क्षितिज संदीप कोल्हे ( जि. प. माध्यमिक शाळा पिंपळगाव )

प्रोत्साहन - तृधा किरण खडगी ( पीएमश्री नगरपरिषद शाळा कळमेश्वर ), खेमाताई रूपचंद बोंदरे ( जि. प. प्राथमिक शाळा बीडबोथली )

गट ब - वर्ग ९ ते १२

प्रथम - योगिता छाया मुरलीधर ठाकरे ( जगदंबा ज्युनियर कॉलेज यवतमाळ )

द्वितीय - कल्याणी शालिक अंबरते (गोमुख विद्यालय नांदागोमुख)

तृतीय - शर्वरी गजानन कोठेकर (पीपल्स ज्युनिअर कॉलेज यवतमाळ )

प्रोत्साहन - मीनल बाबा कांबळे (नेहरू जुनिअर कॉलेज हिंगणा ), अथर्व संजय दिवटे ( लालबहादूर शास्त्री विद्यालय बाबुळवाडा )

विशेष पुरस्कार

रीयांशी रोशन गमे (जि. प. उच्च प्राथमिक शाळा नवरगाव) प्रियांशी लक्ष्मण शेंडे (जि. प. उच्च प्राथमिक शाळा खेतापूर) प्रवीण रवींद्र पाटील ( जि. प. उच्च प्राथमिक शाळा धामणगाव)




# 'विकासाचे व्हिजन'


लेखक



**मनिष शिंगणे**
उमरेड, जि. नागपूर


**१७ जानेवारी २०१८- अनाथ मुलांना १ टक्के समांतर आरक्षण**

राज्यातील अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गात १ टक्के समांतर आरक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ जानेवारी २०१८ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर खुल्या जगात वावरताना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागते. विशेषतः त्यांचा प्रवर्ग निश्चित नसल्याने त्यांना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सवलती आणि लाभांपासून वंचित राहावे लागत होते. यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने या मुलांना आरक्षण मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते.

**४ जून २०१८- दमणगंगा-वैतरणा-गोदावरी पहिल्या नदीजोड प्रकल्पाला मान्यता**

दमणगंगा, वैतरणा या दोन खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी पूर्वेकडे गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी दमणगंगा-वैतरणा-गोदावरी उपसा जोड योजना तयार करण्याबाबत प्राथमिक सकारात्मक अहवाल राज्य सरकारकडे आला होता. त्यावर राज्य सरकारने अजून सखोल सर्वेक्षण आणि अन्वेषण करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मान्यता घेण्यात आली. सदर प्रकल्पासाठी देवेंद्र फडणवीस सरकारने २३ कोटी १४ लाख ५४ हजार ६८० रुपयांच्या खर्चास मान्यता दिली. त्याचा शासन निर्णय ४ जून २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आला.

**३० नोव्हेंबर २०१८- मराठा आरक्षण २०१८ विधेयक एकमताने विधिमंडळात मंजूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत २९ नोव्हेंबर २०१८ रोजी राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) असलेल्या मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देणारे विधेयक एकमताने मंजूर करून घेतले. या विधेयकावर राज्यापालांनी ३० नोव्हेंबर रोजी सही केल्याने याचे कायद्यात रुपांतर होऊन १ डिसेंबर २०१८ पासून हा कायदा लागू झाला.

**२३ मे २०१९- स्टार प्रचारक देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात २६ पैकी २३ खासदार विजयी**

देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ची पुनरावृत्ती करत युतीला ४८ पैकी ४१ जागा जिंकून आपले राज्यातील वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे राजकीय विश्लेषक आणि पत्रकारांकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांना देवेंद्र फडणवीस वरचढ ठरल्याचे बोलले जाते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत युतीने ४८ पैक ४२ जागा जिंकल्या होत्या. त्यावेळी भाजपाने २६ लढवून २३ जागांवर तर शिवसेनेने २२ जागा लढवून १८ जिंकल्या होत्या. या दोन्ही निवडणुकीत विजयाचे श्रेय देवेंद्र फडणवीस यांना जाते. त्यांनी आपल्या सहकारी पक्षांना नेहमीच सांभाळून घेतले. २०१९ च्या निवडणुकांना सामोरे जाण्यापूर्वी त्यांना मराठा आरक्षण आणि दुष्काळामुळे शेतीवर आलेल्या संकटाला सामोरे जावे लागले होते. त्यावेळी देवेंद्रजींनी ही दोन्ही प्रकरणे अत्यंत सक्षमपणे हाताळत मराठा समाजाला आतापर्यंतच्या इतिहासातील पहिले आरक्षण लागू केले. मराठा समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असल्याचे सिद्ध करण्यासाठी मागासवर्ग आयोगाची स्थापना केली. २०१७ मध्ये शेतकऱ्यांसाठी सर्वांत मोठी कर्जमाफी लागू केली. तर अशाप्रकारे देवेंद्रजींनी सरकारचे प्रमुख आणि पक्षातील राज्याचे नेते अशा दोन्ही भूमिका बजावून मतदारांपर्यंत आपली कामे पोहोचवण्यासाठी मेहनत घेतली. त्या मेहनतीला लोकसभेच्या निवडणुकीत चांगले यश मिळाले.

**१ ऑगस्ट २०१९- महाजनादेश यात्रा २०१९: जनतेसमोर पाच वर्षांतील कामांचा आढावा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या दरम्यान केलेल्या विकासकामांची माहिती जनतेला देण्याच्या उद्देशाने १ ते ३१ ऑगस्ट २०१९ या दरम्यान महाराष्ट्रात महाजनादेश यात्रा काढली. ही यात्रा दोन टप्प्यात काढण्यात आली. महाजनादेश यात्रेचा पहिला टप्पा १ ऑगस्टला अमरावतीतील मोझरीपासून सुरू झाला. या टप्प्यात १४ जिल्ह्यातील ५७ विधानसभा मतदारसंघातून १६३९ किमीचा प्रवास करण्यात आला. त्याचा समारोप ९ ऑगस्ट रोजी नंदुरबारमध्ये करण्यात आला. तर महाजनादेश यात्रेचा दुसरा टप्पा १७ ऑगस्ट रोजी सुरू होऊन तो ३१ ऑगस्टला संपला. या टप्प्यात १८ जिल्हे, ९३ विधानसभा मतदारसंघांचा समावेश करण्यात आला होता. २७४५ किमीचा प्रवास करून ३१ ऑगस्ट रोजी यात्रेचा नाशिकमध्ये समारोप करण्यात आला.

एकूण ३२ जिल्ह्यांमधून गेलेल्या या यात्रेचा एकूण ४३८४ किमी प्रवास झाला. देवेंद्र फडणवीस यांनी १५० मतदारसंघांना भेट दिली. या भेटीत ८७ मोठ्या सभा, ५७ स्वागत सभा आणि २३८ गावांमध्ये स्वागत समारंभ घेण्यात आले. विदभार्तील ४४ मतदारसंघात १२३२ किमी, उत्तर महाराष्ट्रातील ३४ मतदारसंघात ६२२ किमी, मराठवाड्यातील २८ मतदारसंघात १०६९ किमी, पश्चिम महाराष्ट्रातील २९ मतदारसंघात ८१२ किमी आणि कोकणातील १५ मतदारसंघात ६३८ किमी महाजनादेश यात्रेचा प्रवास झाला. या यात्रेच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस सरकराच्या ५ वर्षातील कामांची माहिती देण्यात आली.

**२४ ऑक्टोबर २०१९- विधानसभा निवडणूक २०१९: देवेंद्र फडणवीस यांचा पाचव्यांदा विधानसभेत प्रवेश**

२०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भाजपा-शिवसेना युतीचे सरकार आले होते. या सरकारचे प्रमुख म्हणून फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ असे ५ वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम केले. या ५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी महाराष्ट्रात अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवले.मुंबईत मेट्रोचे जाळे निर्माण होऊ लागले. समृद्धी महामार्ग, कोस्टल रोड, जलयुक्त शिवार या योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासाने वेग घेतला. त्याचबरोबर मराठा आरक्षणासाठी घेतलेली भूमिका, अनाथांना मिळवून दिलेले समांतर १ टक्के आरक्षण अशा योजनांमुळे जनतेने पुन्हा एकदा महायुतीला कौल दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुकीत पक्षाला दुसऱ्यांदा शंभरीचा आकडा पार करून देण्यात देवेंद्रजींचे मोठे योगदान राहिले. या निवडणुकीत भाजपाचे १०५ आमदार निवडून आले. तर या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून विजय मिळवत सलग पाचव्यांदा विधिमंडळात प्रवेश केला. देवेंद्र फडणवीस यांनी १ लाख ९ हजार २३७ मते मिळवत विरोधी पक्षाच्या उमेदवाराचा ४९ हजार २८८ मतांनी पराभव केला. २०१४ ते २०१९ असे ५ वर्षे मुख्यमंत्रीपद भूषवल्यानंतर त्यांचा या निवडणुकीत पुन्हा एकदा करिष्मा पाहायला मिळाला. मुख्यमंत्री म्हणून राबवलेल्या नाविन्यपूर्ण योजना तसेच महाजनादेश यात्रेच्या माध्यमातून केलेला प्रचार यशस्वी ठरला.

**१२ नोव्हेंबर २०१९- मुख्यमंत्रीपदाची ५ वर्षे पूर्ण करणारे दुसरे मुख्यमंत्री**

देवेंद्र फडणवीस यांचा ३१ ऑक्टोबर २०१४ मध्ये सुरू झालेला मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाल १२ नोव्हेंबर २०१९ रोजी संपुष्टात आला. त्यांनी एकूण ५ वर्षे १२ दिवस मुख्यमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. मुख्यमंत्रीपदाची ५ वर्षे पूर्ण करणारे ते दुसरे मुख्यमंत्री ठरले आहेत. यापूर्वी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी सलग दोन टर्म ११ वर्षे ७८ दिवस मुख्यमंत्री म्हणून काम केले होते.

**२३ नोव्हेंबर २०१९- देवेंद्र फडणवीस यांनी दुसऱ्यांदा घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ**

२०१९च्या विधानसभेच्या निकालानंतर शिवसेनेने मुख्यमंत्रीपदासाठी भाजपसोबत असलेली २५ वर्षांची युती तोडली. त्यामुळे विधानसभेत सर्वाधिक १०५ आमदार निवडून येऊनही भाजपाला सत्ता स्थापन करता येत नव्हती. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या मदतीने २३ नोव्हेंबर २०१९ रोजी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पण हे सरकार फार काळ टिकले नाही. अजित पवार यांनी काही कारणांमुळे उपमुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनीही २६ नोव्हेंबर २०१९ रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. महाराष्ट्राच्या इतिहासातील हे सर्वांत कमी कालावधीचे, ७२ तासांचे सरकार ठरले. सर्वाधिक कालावधी म्हणजेच संपूर्ण ५ वर्षे कालावधी पूर्ण करणारे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे दुसरे मुख्यमंत्री ठरले आहेत.

**१ डिसेंबर २०१९- राज्याच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड**

२०१९ च्या विधानसभेच्या निवडणुकांनंतर शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी करून २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले होते. त्यावेळी भाजपाचे स्वतःचे १०५ आमदार असूनही विरोधी पक्षात बसण्याचा निर्णय घेतला. यावेळी विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांनी १ डिसेंबर २०१९ ते २९ जून २०२२ असे २ वर्षे २१० दिवस विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद भूषविले. या कालावधीत त्यांनी महाविकास आघाडी सरकारला सळो की पळो करून सोडले होते. मंत्र्यांचा भ्रष्टाचार असो किंवा सरकारकडून राबवली जाणारी चुकीची धोरणे असो, अशा सगळ्याच गोष्टींवर विरोधी पक्षनेते म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी सरकारला धारेवर धरले होते.

**३० सप्टेंबर २०२०- बिहार निवडणूक प्रभारीः भाजपाला बिहारमध्ये चांगले यश**

२०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची बिहारचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी बिहारमधील भाजपाच्या प्रचार मोहिमेचे नेतृत्व करत बिहारमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभा डिजिटल माध्यमातून प्रसारित करण्याचा निर्णय घेतला. ज्यामुळे कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर राखता येईल. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच गावांमध्ये एलईडी स्क्रीनद्वारे या सभा दाखवण्यात आल्या. ज्यामुळे १०० सभा एकाच वेळी आयोजित करता आल्या. त्यांनी भाजपाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत सक्रिय सहभागी होऊन प्रचाराची रणनीती ठरवली. तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपाने बिहारमध्ये आधुनिक प्रचार तंत्रांचा वापर केला. या निवडणुकीत भाजपाला बिहारमध्ये चांगले यश मिळाले.

**८ सप्टेंबर २०२१-गोवा निवडणूक प्रभारी : देवेंद्र फडणवीस यांची रणनीती आणि यश**

भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने गोव्यातील आगामी विधानसभेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांची ८ सप्टेंबर २०२१ रोजी गोव्याचे भाजपचे निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली. या नियुक्तीनंतर त्यांनी गोव्यातील राजकीय परिस्थितीचा सखोल अभ्यास करून स्थानिक नेतृत्वाशी समन्वय साधत तिथल्या प्रचारात उत्साह आणला. कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करून त्यांना विरोधी पक्षाशी लढण्यासाठी बळ दिले. देवेंद्र फडणवीस यांनी गोव्यातील विविध जिल्ह्यांत दौरे करून कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला आणि निवडणूक यंत्रणा अधिक प्रभावीपणे कार्यान्वित केली. त्यांच्या या रणनीतीमुळे भाजपने गोव्यात सत्ता कायम राखण्यात यश मिळवले. गोव्यामध्ये विधानसभेच्या एकूण



४० जागा आहेत. त्यातील २० जागा जिंकून भाजपाने गोव्याची सत्ता राखली होती. या निवडणुकीत फडणवीस यांचे पुन्हा एकदा निवडणूक जिंकण्याचे कौशल्य अधोरेखित झाले.

**३० जून २०२२- राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी**

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे उद्धव ठाकरे यांचे सरकार कोसळले. त्यानंतर झालेल्या राजकीय घडामोडीनंतर देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीने एकनाथ शिंदे यांनी सरकार स्थापन केले. या सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी ३० जून २०२२ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली तर, देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

**१४ ऑगस्ट २०२२- महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून प्रथमच स्वीकारली जबाबदारी**

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत केलेल्या उठावानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्यानंतर त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या मदतीने ३० जून २०२२ रोजी महायुतीचे सरकार स्थापन केले. या सरकारमध्ये एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली. या सरकारचे खातेवाटप १४ ऑगस्ट २०२२ रोजी करण्यात आले. या खाते वाटपात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, वित्त व नियोजन, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा आणि राजशिष्टाचार ही खाती देण्यात आली. त्यातील वित्त व नियोजन या खात्याची जबाबदारी त्यांनी प्रथमच स्वीकारली होती. १४ ऑगस्ट ते १४ जुलै २०२३ पर्यंत त्यांनी अर्थ खात्याची जबाबदारी स्वीकारली.

**१७ ऑगस्ट २०२२- देवेंद्र फडणवीस यांची भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीत निवड**

भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीत देवेंद्र फडणवीस यांचा १७ ऑगस्ट २०२२ रोजी समावेश करण्यात आला. ही नियुक्ती पक्षाच्या उच्च नेतृत्वाने त्यांच्या नेतृत्वक्षमता, संघटन कौशल्य आणि राज्य व राष्ट्रीय पातळीवरील अनुभवाच्या आधारे केली आहे. देवेंद्र फडणवीस यांचा या समितीत सहभाग झाल्यामुळे महाराष्ट्रातील भाजप कार्यकर्त्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले.

**११ डिसेंबर २०२२-समृद्धी महामार्ग - नागपूर ते शिर्डी टप्प्याचे उद्घाटन**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गातील ७०१ किलोमीटरपैकी नागपूर-शिर्डी ५२० किलोमीटर या पहिल्या टप्प्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०२२ रोजी उद्घाटन करण्यात आले. हा प्रकल्प देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. २०१५ मध्ये मुख्यमंत्री असताना त्यांनी याची संकल्पना आणि घोषणा केली होती. समृद्धी महामार्ग हा ५५ हजार कोटी रुपये खर्च करून बांधला जात आहे. हा भारतातील सर्वांत लांब एक्सप्रेस-वे पैकी एक आहे. नागपूर ते मुंबई या प्रवासादरम्यान तो १० जिल्हे, २६ तालुके आणि साधारण ४०० गावांना थेट जोडणारा महामार्ग आहे.

**१३ डिसेंबर २०२२- जलयुक्त शिवार योजना २.० योजना**

जून २०२२ मध्ये राज्यातील महाविकास आघाडी सरकार जाऊन पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आले. देवेंद्र फडणवीस राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १३ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यात जलयुक्त शिवार २.० अभियान सुरू करण्यास मान्यता दिली. तसेच येणाऱ्या ३ वर्षात या योजनेंतर्गत ५ हजार गावांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला. जलयुक्त शिवार २.ड योजनेचा शासन निर्णय ३ जानेवारी २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आला.

**९ मार्च २०२३- अर्थमंत्री म्हणून प्रथमच मांडला अर्थसंकल्प!**

देवेंद्र फडणवीस यांनी ९ मार्च २०२३ मध्ये अर्थमंत्री म्हणून आपल्या जीवनातीलच नाही, तर देशाच्या अमृतकाळातील पहिला अर्थसंकल्प (२०२३-२४) सादर केला. हा अर्थसंकल्प पाच अमृतांवर आधारित मांडण्यात आला. यामध्ये पहिले अमृत होते, शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी, दुसरे अमृत महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास, तिसरे अमृत भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधांचा विकास, चौथे अमृत रोजगार निर्मिती आणि पाचवे अमृत पर्यावरणपूरक विकास होते. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक नवीन योजना सुरू केल्या. तर काही योजनांचा थेट लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केला. त्यातीलच एक योजना म्हणजे नमो शेतकरी महा सन्मान निधी योजना. त्यानंतर अवघ्या १ रुपयांत पीकविमा उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला. त्याचबरोबर नदी जोड प्रकल्प, मराठवाडा वॉटरग्रीड प्रकल्प, मुलींसाठी लेक लाडकी योजना, महिलांसाठी एसटीच्या तिकिटात ५० टक्के सवलत अशा समाजोपयोगी योजना सुरू केल्या.

**१६ सप्टेंबर २०२३- ७ वर्षांनी पुन्हा एकदा मराठवाड्यासाठी विशेष बैठक व निधी**

२०१६ मध्ये युतीचे सरकार असताना देवेंद्र फडणवीस यांनी ४ ऑक्टोबर २०१६ मध्ये मराठवाड्यासाठी मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेतली होती. त्यानंतर ७ वर्षांनी पुन्हा एकदा महायुती सरकारने मराठवाड्यासाठी १६ सप्टेंबर २०२३ रोजी मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेतली होती. या बैठकीत ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरण, जलसिंचन प्रकल्पांच्या खर्चास सुधारित मान्यता, फिरती प्रयोगशाळा, दिवाणी न्यायालय, नवीन कृषि व कृषि व्यवसाय व व्यवस्थापन महाविद्यालय, सरकारी मेडिकल कॉलेज, इन्क्युबेशन सेंटर, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ असे एकूण २० प्रकारचे निर्णय घेण्यात आले. महायुती सरकारने मराठवाड्याचा विकास करण्याच्या दृष्टिने एकूण ४६,५७९ कोटी ३६ लाख रुपये खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये विकासकामे आणि योजनांसाठी ३७ हजार १६ कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**११ मार्च २०२४- कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतिदिनी म्हणजे ११ मार्च (११ मार्च २०२४) या दिवशी कोस्टल रोडच्या वरळी ते मरीन ड्राईव्ह या पहिल्या टप्प्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत धर्मवीर स्वराजरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाचे उद्घाटन झाले. हा मार्ग, वरळी, बान्द्रे, वर्सोव्हा, कांदिवली आणि पुढे विरारपर्यंत करण्यात येणार आहे.

**४ जून २०२४- स्टार प्रचारक देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात लोकसभेत महायुतीचा स्ट्राईक रेट ४२.७३ टक्के**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी संपूर्ण राज्य पिंजून काढले. लोकसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर त्यांनी २६ मार्च २०२४ रोजी पहिली सभा चंद्रपूरमध्ये घेतली. तर शेवटची सभा १८ मे २०२४ रोजी भिवंडी येथे घेतली. या ५२ दिवसांच्या कालावधीत त्यांनी ११५ सभा घेतल्या. तर वर्तमानपत्रे, टीव्ही चॅनेल, डिजिटल प्लॅटफॉर्म, मॅगझीन अशा जवळपास ६७ प्रकारच्या माध्यमांना मुलाखती दिल्या. राज्यभरात घेण्यात आलेल्या सभांमधून त्यांनी देशपातळीवरील अनेक विषयांवर आपली मते व्यक्त केली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील दहा वर्षात केलेला विकास, आर्थिक धोरणे-सुधारणा, देशाच्या सुरक्षिततेविषयीचे मुद्दे, हिंदुत्व, खासदारांनी स्थानिक पातळीवर केलेली कामे आदी गोष्टी आपल्या भाषणांतून मांडल्या. लोकसभेची निवडणूक महाराष्ट्रात ५ टप्प्यात पार पडली. या टप्प्यानुसार त्यांनी विदर्भ, मराठवाडा, जळगाव, पुणे आणि मुंबईमध्ये सभा, रोड-शो, कार्यकर्ते-पदाधिकारी यांच्या भेटी घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, या निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपाला चांगल्या जागा निवडून आल्या नसल्या तरी भाजपाचा स्ट्राईक रेट मात्र चांगला राहिला होता. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा फक्त १.१८ टक्के मते अधिक मिळाली. पण महाविकास आघाडीने ३० जागा जिंकल्या तर युतीच्या १७ जागा निवडून आल्या. महाविकास आघाडीला ४३.९१ टक्के तर महायुतीला ४२.७३ टक्के मते मिळाली. भारतीय जनता पार्टीला या निवडणुकीत १ कोटी ४९ लाख ६६ हजार ५७७ मते मिळाली.

**२३ नोव्हेंबर २०२४- विरोधकांच्या खोट्या प्रचाराला देवेंद्र फडणवीस यांच्याकडून लगाम; तर नागपुरातून विजयी षटकार**

लोकसभेच्या निवडणुकीदरम्यान महाविकास आघाडी सरकारने घटनेमध्ये बदल करण्याचा खोटा मुद्दा रेटून धरला. त्यामुळे संपूर्ण राज्यभर आरक्षण जाणार असा अनेक घटकांचा समज झाला. परिणामी, दलित-आदिवासी मतदारांचे ध्रुवीकरण झाले आणि त्याचा फटका लोकसभा निवडणुकांमध्ये बसला. पण विधानसभेच्या निवडणुकीत मात्र देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारचा खोटा प्रचार उधळून लावला. लोकांमध्ये जाऊन आरक्षण कसे अबाधित आहे, हे पटवून दिले. त्याचबरोबर मागील अडीच वर्षात केलेली कामे, मुख्यमंत्री असताना महाराष्ट्राचा केलेला विकास याची माहिती मतदारांना देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. या निवडणुकीत भाजपाचे १३२ आमदार निवडून आले. देवेंद्रजींच्या नेतृत्वाखाली पक्षाला मिळालेला हा सर्वांत मोठा विजय होता.

२०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीची संपूर्ण धुरा ही देवेंद्र फडणवीस यांच्यावर होती. वैयक्तिक त्यांनी नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून १ लाख २९ हजार ४०१ मते मिळवत मोठा विजय मिळवला. या विजयाने त्यांनी आमदरकीच्या निवडणुकीत विजयाचा षटकार मारला आहे. आतापर्यंत त्यांनी सहावेळा नागपूरमधून विजय मिळवला आहे. यावेळचे त्यांचे विजयाचे मार्जिन ३९,७१० इतके राहिले. तर त्यांना एकूण ५६.८८ टक्के मते मिळाली. राज्यात भाजपाने १५२ जागा लढवून १३२ जागा जिंकल्या. भाजपाचा स्ट्राईक रेट जवळपास ८७ टक्के राहिला. भारतीय जनता पार्टीचे स्टार कॅम्पेनर आणि राज्यातील प्रमुख नेते म्हणून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी राज्यभरात प्रचाराचा झंझावात केला. त्यांनी एकूण ६४ ठिकाणी रॅली, रोड शो आणि जाहीर सभा घेतल्या होत्या.

संपादकीय लेखणीतून...

# १६ वर्षानंतर विजय

संपूर्ण विश्वाचे रविवारी अमेरिकेतील न्यूजर्सी स्टेडियमकडे लक्ष लागले होते. कारण तेथे फुटबॉल जगतातील सर्वांत मोठ्या महाकुंभाचा अंतिम सामना होणार होता. लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिना आणि रॉड्रीच्या स्पेन संघादरम्यान अंतिम लढत होणार होती. ही लढत चित्तथरारक होईल, असा अंदाज होता; पण तो फोल ठरला. हा सामना फुटबॉल इतिहासातील सर्वांत संथ आणि तणावपूर्ण फायनलपैकी एक ठरला. असे असले तरी अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या सामन्यात स्पेनने गतविजेत्या अर्जेंटिनाचा १-० असा पराभव करत फिफा विश्वचषक २०२६ च्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. सामन्यात बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या फेरॉन टोरेसने १०६ व्या मिनिटाला गोल मारून स्पेनला १६ वर्षानंतर ऐतिहासिक विजय मिळवून दिला. दोन्ही बलाढ्य संघांमध्ये ९० मिनिटांपर्यंत एकही गोल होऊ शकला नाही. सामना पेनल्टी शूटआऊटकडे सरकत असतानाच टोरेसने स्पेनसाठी २० व्या प्रयत्नात गोलकोंडी तोडली. यानंतर मैदानात धसमुसळा खेळ सुरू झाला. अर्जेंटिनाच्या खेळाडूंचा संयम सुटल्याने खेळाडूंमध्ये हाणामारी आणि ढकलाढकली सुरू झाली. या ऐतिहासिक सामन्यात दोन्ही संघांच्या प्रमुख खेळाडूंची जादू चालली नाही. 'मेस्सी मॅजिक' दिसली नाही तर स्पेनचा लॅमिन यामलही फिका पडला. ब्राझीलचा महान खेळाडू कॅफू याच्या नंतर ३ विश्वचषक स्पर्धांचा अंतिम सामना खेळणारा मेस्सी जगातील दुसरा खेळाडू ठरला; मात्र या सामन्यात तो पूर्णपणे 'ऑफकलर' दिसला त्यामुळे तो आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. ३९ वर्षीय मेस्सीचे अर्जेंटिनाला तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकून देण्याचे त्याचे स्वप्न भंगले. स्पेनचा युवा स्टार लॅमिन यामल यालाही अर्जेंटिनाच्या बचाव फळीने बांधून ठेवले होते; परंतु या संपूर्ण स्पर्धेत स्पेन संघाचा अभेद्य बचाव सर्वांत उठून दिसला. एकूण ८ सामन्यात या संघाने अवघा एक गोल खाल्ला आहे. यावरून स्पेनच्या गोलरक्षकाची अफलातून कामगिरी लक्षात येते. अर्जेंटिना संघाला आक्रमक खेळ करताच आला नाही. उलट त्यांच्या नावावर एका लाजिरवाण्या विक्रमाची नोंद झाली आहे.

९० मिनिटांपर्यंत त्यांना गोल जाळ्याच्या दिशेने एकही फटका मारता आला नाही. सामना हातातून निसटत आहे हे लक्षात आल्यानंतर मेस्सीचे सहकारी स्पेन खेळाडूंच्या जर्सी ओढण्यात आणि धक्के मारण्यात व्यस्त दिसले. भरपाई वेळेत स्पेनच्या कुबासीर्ला चुकीच्या पद्धतीने पाडल्याबद्दल अर्जेंटिनाच्या एन्झो फर्नांडिसला रेड कार्ड दाखवण्यात आले त्यामुळे अर्जेंटिना संघाला १० खेळाडूंसह खेळावे लागले. दोन्ही संघाचे प्रमुख खेळाडू चमकले नसले तरी स्पेनचे बदली खेळाडू हिरो ठरले. टोरेस आणि निको विल्यम्स या बदली खेळाडूंनी उत्तरार्धात मैदानात वेगवान ऊर्जा आणली आणि सामना स्पेनच्या बाजूने झुकवला. स्पेनला विश्वचषक जिंकून देण्यात मुख्य प्रशिक्षक ६५ वर्षीय लुईस डी ला फुरंडे यांचा मोठा वाटा आहे. ते इतिहासातील सर्वांत वयस्कर प्रशिक्षक ठरले आहेत. विश्वचषकाचा अंतिम सामना पाहण्यासाठी व्हीआयपी बॉक्समध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि फिफा प्रमुख गियानी इन्फँटिनो उपस्थित होते. सामन्याचा पूर्वार्ध इतका संथ होता की, फुटबॉलपेक्षा हाफ टाईममधील मनोरंजनच चाहत्यांच्या लक्षात राहिले असेल. हाफटाईम शोमध्ये मॅडोना, जस्टीन बीबर आणि प्रसिद्ध काल्पनिक प्रशिक्षक टेड लॅसो उपस्थित होते. शकिराने तिची प्रसिद्ध गाणी सादर केली. मैदानातील मोठ्या स्क्रीनवर 'डायनामाईट' आणि 'लाईट इट अप'असे शब्द चमकत होते; मात्र मैदानावरील दोन्ही संघ शांतच दिसत होते. सामन्याच्या प्रारंभापासून स्पेनने चेंडूवर ताबा ठेवत अर्जेंटिनाला दबावाखाली ठेवले होते.

अर्जेंटिनाचा गोली मार्टिनेझने अनेक वेळा स्पेनचे आक्रमण थोपवल्याने सामना गोल शून्य स्थितीत राहिला. जादा वेळेच्या दुसऱ्या हाफमध्ये विल्यम्सने दिलेल्या अचूक पासवर टोरेसने गोल करत स्पेनचा विजय निश्चित केला. गोल बरोबरी साधण्यासाठी अर्जेंटिनाने शर्थीचे प्रयत्न केले; पण स्पेनचा अभेद्य बचाव ते भेदू शकले नाहीत. स्पेनच्या शिस्तबद्ध खेळापुढे त्यांचा निभाव लागला नाही. स्पेनचे हे यश त्यांच्या फुटबॉल संस्कृतीचा आणि नवीन पिढीच्या गुणवत्तेचा विजय मानला जात आहे. स्पेन संघाचा अभेद्य बचाव तर आहेच; पण ते 'टिकी-टाका' खेळासाठी प्रसिद्ध आहेत म्हणजे ते छोटे छोटे पास देत प्रतिस्पर्ध्याला चकवण्यात माहिर आहेत. यंदाच्या स्पर्धेत फिफातर्फे एकूण ८४०० कोटींची बक्षीसे वितरित केली जाणार आहेत. विजेत्या स्पेन संघावर कोट्यवधी रुपयांचा पाऊस पडला आहे. विश्वविजेतेपद मिळवल्याबद्दल त्यांना सुमारे ४९० कोटी (५.१ कोटी डॉलर्स), उपविजेत्या अर्जेंटिना संघाला ३१७ कोटी (३.३ कोटी डॉलर्स), तिसऱ्या क्रमांकावरील संघाला २७९ कोटी तर चौथ्या क्रमांकावरील संघाला २५९ कोटी मिळणार आहेत. विश्वकप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच चॅम्पियन संघातील खेळाडू आणि कर्मचाऱ्यांना ट्रॉफी आणि गोल्ड मेडलसोबतच चॅम्पियनशिप रिंगदेखील दिली जाणार आहे. यंदाच्या स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू फ्रान्सचा किलियन एम्बाप्पे ठरला. मेस्सीला मागे टाकत तो 'गोल्डन बुट'चा मानकरी ठरला. एम्बाप्पेने संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक १० गोल केले आहेत. सलग दुसऱ्यांदा त्याने हा पुरस्कार पटकावला आहे. स्पेनचा गोलरक्षक सिमोन सर्वोत्कृष्ट गोलरक्षक ठरला. फक्त एकदाच त्याचा बचाव भेदण्यात आला. त्याला 'गोल्डन ग्लव्हज'चा पुरस्कार देण्यात आला. मधल्या फळीतील स्टार खेळाडू म्हणून स्पेनच्या रॉड्रीला 'गोल्डन बॉल'चा पुरस्कार देण्यात आला. स्पर्धेतील सर्वोत्तम युवा खेळाडू म्हणून स्पेनचा युवा बचावपटू पाऊ कुर्बासी याची निवड करण्यात आली. अंतिम सामन्यातील पराभवासह अर्जेंटिनाचा अत्यंत खडतर विश्वचषक मोहिमेचा शेवट झाला.

# शिक्षणात तंत्रज्ञान वापराची गरज

**सचिन चव्हाण**
**रामटेक**

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. जगातील प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाने क्रांती घडवून आणली आहे. शिक्षण क्षेत्रही याला अपवाद नाही. एकेकाळी शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित होते; परंतु आज संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, स्मार्ट बोर्ड, कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-लर्निंग आणि डिजिटल साधनांमुळे शिक्षण अधिक प्रभावी, आकर्षक आणि सर्वसमावेशक झाले आहे. त्यामुळे शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज बनली आहे.

शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणे हा आहे. केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देणे एवढाच शिक्षणाचा हेतू नसून विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, संवाद कौशल्य आणि आधुनिक जीवनासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणेही महत्त्वाचे आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तंत्रज्ञान अत्यंत प्रभावी साधन ठरते.

तंत्रज्ञानामुळे अध्यापन अधिक रंजक आणि परिणामकारक बनते. चित्रफिती, ॲनिमेशन, सादरीकरणे, आभासी प्रयोगशाळा, डिजिटल नकाशे आणि शैक्षणिक ॲप्स यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना अवघड संकल्पना सहज समजतात. प्रत्यक्ष अनुभवासारखे शिक्षण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची समज वाढते आणि शिकण्याची उत्सुकता टिकून राहते. त्यामुळे शिक्षण केवळ पाठांतरावर आधारित न राहता अनुभवाधारित आणि कौशल्याधारित बनते.

तंत्रज्ञानामुळे शिक्षणाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जगातील कोणत्याही ठिकाणचे ज्ञान काही क्षणांत मिळू शकते. ऑनलाइन वर्ग, डिजिटल ग्रंथालये, ई-पुस्तके, शैक्षणिक संकेतस्थळे आणि मुक्त ऑनलाइन अभ्यासक्रम यांमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे शिक्षणातील भौगोलिक अडथळे कमी झाले असून "शिक्षण सर्वांसाठी" हे ध्येय अधिक सुलभ झाले आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात तंत्रज्ञानाचे महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित झाले. शाळा आणि महाविद्यालये बंद असतानाही ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणात टळले. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, डिजिटल असाइनमेंट्स, ऑनलाइन परीक्षा आणि ई-लर्निंग प्लॅटफॉर्म यांच्या साहाय्याने शिक्षणाची प्रक्रिया अखंड सुरू राहिली. या अनुभवामुळे शिक्षण व्यवस्थेत डिजिटल तंत्रज्ञानाचे स्थान अधिक दृढ झाले. तंत्रज्ञानामुळे शिक्षकांची कार्यक्षमताही वाढते. अध्यापनाचे नियोजन, सादरीकरणे तयार करणे, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन, उपस्थिती नोंद, प्रगती अहवाल आणि पालकांशी संवाद यांसारखी अनेक कामे डिजिटल पद्धतीने अधिक वेगाने आणि अचूकपणे करता येतात. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक प्रगतीकडे अधिक लक्ष देता येते. विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता विकसित करणे ही आजची मोठी गरज आहे. भविष्यातील रोजगार, संशोधन, उद्योग, प्रशासन आणि दैनंदिन जीवनात तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संगणक हाताळणे, माहितीचे विश्लेषण करणे, इंटरनेटचा सुरक्षित वापर करणे आणि डिजिटल साधनांचा जबाबदारीने उपयोग करणे ही कौशल्ये शिक्षणातूनच आत्मसात करावी लागतील.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरावर विशेष भर देण्यात आला आहे.

तथापि, तंत्रज्ञानाचा वापर करताना काही आव्हानेही लक्षात घ्यावी लागतात. ग्रामीण भागात इंटरनेटची मर्यादित उपलब्धता, आर्थिक अडचणी, डिजिटल साधनांचा अभाव, वीजपुरवठ्याच्या समस्या आणि शिक्षकांचे अपुरे तांत्रिक प्रशिक्षण ही महत्त्वाची आव्हाने आहेत. तसेच विद्यार्थ्यांकडून मोबाईल किंवा इंटरनेटचा गैरवापर, सोशल मीडियाचे व्यसन आणि चुकीच्या माहितीचा प्रसार यांसारख्या समस्यांवरही नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर हा विवेकपूर्ण, सुरक्षित आणि शैक्षणिक उद्देशानेच व्हायला हवा.

यासाठी शासन, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक आणि समाज यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेत डिजिटल सुविधा उपलब्ध करून देणे, शिक्षकांना नियमित तांत्रिक प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांना डिजिटल नैतिकतेचे शिक्षण देणे आणि ग्रामीण भागात इंटरनेट सुविधा मजबूत करणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञान हे शिक्षकांची जागा घेणारे साधन नसून शिक्षकांना अधिक सक्षम बनविणारे प्रभावी माध्यम आहे, ही जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे.

शेवटी असे म्हणता येईल की, शिक्षणात तंत्रज्ञानाचा योग्य आणि संतुलित वापर केल्यास शिक्षण अधिक दर्जेदार, सर्वसमावेशक, सर्जनशील आणि भविष्याभिमुख होईल. ज्ञानाधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी आणि जागतिक स्तरावर सक्षम, आत्मविश्वासू व कुशल नागरिक घडविण्यासाठी शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर ही केवळ गरज नसून भविष्यातील प्रगतीची अपरिहार्य अट आहे.

- ९१५८३९३२६०

# न्यायव्यवस्था आणि संसदची वस्तुस्थिती

**सुनील शिरपुरे**
**यवतमाळ**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, लोककवी आणि दलित साहित्याचे जनक होते. त्यांनी आपल्या साहित्यातून आणि भाषणांतून शोषक व्यवस्थेवर नेहमीच कठोर शब्दांत आसूड ओढले. अण्णाभाऊ म्हणाले होते की, न्याय व्यवस्था काहीकांची रखेल झाली, ही संसद देखील हिजड्याची हवेली झाली, मी माज्या व्यथा मांडू कोणाकडे? कारण इथली न्यायव्यवस्था भ्रष्टतेने रंगीन झाली. या विधानातून अण्णाभाऊंनी न्यायालये आणि न्याय देणा-या संस्थांवर ताशेरे ओढले आहेत. न्याययंत्रणा जेव्हा सामान्य जनतेला न्याय देण्याऐवजी सत्ताधा-यांची किंवा धनिकांची अंकित (गुलाम) बनते, तेव्हा तिच्यावर हा उपरोधिक आणि संतापजनक शब्दांत प्रहार केला जातो.

संसद जी लोकशाहीचे मंदिर मानली जाते, ती जेव्हा सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यात असमर्थ ठरते आणि हतबल होते, तेव्हा तिला 'हिजड्यांची हवेली' या उपरोधिक शब्दांनी संबोधले गेले आहे. याचा अर्थ असा की, जेव्हा सत्तेत बसलेले लोकप्रतिनिधी मुकदर्शक बनून अन्यायाकडे पाहतात आणि स्वतःच्या हक्कासाठी लढत नाहीत, तेव्हा ती संसद जनतेच्या दृष्टीने कमकुवत आणि निरुपयोगी ठरते. सांगायचं तात्पर्य म्हणजे सामान्य माणसाच्या व्यथांकडे दुर्लक्ष करणारी आणि भ्रष्टाचाराने बरबटलेली राजकीय व न्यायिक व्यवस्था यावर अण्णाभाऊंनी अत्यंत जळजळीत शब्दांत आपला रोष व्यक्त केला होता.

एकतर्फी प्रेमातील विकृत मानसिकतेच्या प्रत्यक्ष दर्शनाने वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट ह्या शहरातील एका जळीत कांडाने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला होता. हिंगणघाट तालुक्यातील अंकिता पिसुड्डे नामक प्राध्यापिकेला ३ जानेवारी २०२० चा प्रभात कर्दनकाळ ठरला. नेहमीप्रमाणे अंकिता नंदोरी चौकातून कॉलेजला पायदळ निघाली होती. सकाळची वेळ असल्यामुळे रस्त्याने जास्त वर्दळ नव्हती. याच निरव शांततेचा पुरेपूर फायदा घेऊन विकेशने हिंगणघाट येथील नंदोरी चौकात अंकिताचा पाठलाग केला आणि अंकिताच्या अंगावर त्याने पेट्रोलची बाटली ओतून आग लावली. त्यामध्ये अंकिता गंभीररित्या भाजली गेली होती आणि उपचारादरम्यान १० फेब्रुवारी २०२० रोजी अंकिताने शेवटचा श्वास घेतला. अखेर दोन वर्षानंतर १० फेब्रुवारी २०२२ रोजी आरोपी विकेश नगराळे याला आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. जर या आरोपीला फाशी दिल्या गेली असती, तर वर्धा जिल्ह्यात अशा गुन्ह्यांची पुनरावृत्ती झाली नसती.

परंतु दुर्दैवाने नसरापूरच्या क्रुरतेची पुनरावृत्ती वर्धेत झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील सावंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रोठा गावात माणुसकीला काळीमा फासणारी आणि काळीज पिळवटून टाकणारी एक घटना उघडकीस आली. जिथे एका १२ वर्षांच्या मुलीवर ३० वर्षीय राहुल राजु मडावी या जवळच्या नातेवाईक नराधमाने लैंगिक अत्याचार केल्यानंतर तिला दगडांनी ठेचून ठार मारले. ही हृदयद्रावक घटना सायंकाळी उघडकीस आली. १५ जुलै रोजी, जेव्हा पीडितेचे आई-वडील खरेदी करून घरी परतले, तेव्हा घरातील दृश्य इतके भयंकर होते की ते कोणाचेही हृदय पिळवटून टाकणारे होते. सकाळी शाळेत गेलेली आणि दुपारी लवकर घरी परतलेली पीडिता घरात नग्न आणि रक्ताने माखलेल्या अवस्थेत पडलेली आढळली. मुलीचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह, कुटुंबियांचा आक्रोश, मुलीची करण्यात आलेली अमानुष हत्येने संपूर्ण गावच सून्न झाले.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेवरून महावितरण आणि ग्राहकांमधील वाद पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. नागपूरात महावितरण कडून जुन्या मीटरच्या जागी सक्तीने स्मार्ट मीटर बसवले जात आहेत. याला तीव्र विरोध करणाऱ्या ग्राहकांना आता महावितरणकडून थेट पत्रे पाठविण्यात येत असून मीटर बसविण्यास विरोध केल्यास आणि सहकार्य न केल्यास वीजपुरवठा खंडित करणे आणि शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील अनेक ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. मुख्यमंत्र्याच्याच नगरीत असले प्रकार होत असतील, तर सामान्य जनता कोणाकडे न्याय मागतील हा गंभीर प्रश्न उदयास येतो.

नीट पेपरफुटी प्रकरण हे देशभरातील वैद्यकीय प्रवेश परीक्षांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराशी संबंधित आहे, ज्यामध्ये महाराष्ट्रातील लातूर आणि देशभरात अनेक ठिकाणी सीबीआयची चौकशी सुरू आहे. या घोटाळ्यात काही कोचिंग क्लासेसचे संचालक आणि प्रश्नपत्रिका फोडणारे मुख्य सूत्रधार अटकेत आहेत. सीबीआयने लातूरमध्ये तात्पुरते कार्यालय थाटून तपासाची व्याप्ती वाढवली आहे. तपासात, रसायनशास्त्र विषयाचे मूळ प्रश्न ५ लाख रुपयांच्या मोबदल्यात फोडल्याचे उघड झाले आहे. 'आरसीसी' कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्यावर प्रश्नपत्रिका फोडल्याचा व लाखो रुपयांची माया गोळा केल्याचा गंभीर आरोप आहे.

पेपरफुटीच्या वादामुळे २१ जून रोजी घेण्यात आलेल्या फेरपरीक्षेचा निकाल १६ जुलै रोजी जाहीर करण्यात आला. मात्र, प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी यश यादव याच्या कामगिरीबाबतचा निकाल एनटीए ने राखून ठेवला आहे. या घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाल्याने देशभरात संतापाची लाट उसळली आहे. दिल्लीत जंतरमंतर येथे आणि महाराष्ट्रात नाशिकसह अनेक ठिकाणी याविरोधात निदर्शने सुरू आहेत. महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटीचे मोठे रॅकेट उघडकीस आले असून या प्रकरणात परीक्षा रद्द करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील एका खाजगी प्रेसमध्ये छापलेला पेपर अवघ्या ८ हजारांत विकल्याचे आणि मुख्य सूत्रधार विजेंद्रकुमार गुप्ता याला प्रत्येक पेपरमागे ७० हजार रुपये कमवायचे असल्याचे उघड झाले. त्यानंतर विविध एजंटांनी त्यावर स्वतःचे कमिशन जोडत किंमत आणखी वाढवली. तब्बल सहा लाखांहून अधिक शिक्षक उमेदवारांचे भविष्य ठरवणारी प्रश्नपत्रिका कोणत्याही हॅकिंगने किंवा अत्याधुनिक तंत्रज्ञानाने नव्हे, तर एका साध्या बुटाच्या मदतीने छापखान्यातून बाहेर काढण्यात आली. त्यासाठी मोबदला किती मिळाला, तर अवघे ८ हजार रुपये आणि भविष्यात एक प्लॉट देण्याचे आश्वासन.

चक्क शाळेच्या वेळेतच मुख्याध्यापिका अत्यंत गाढझोपेत आढळून आल्याचा आरोप नेर तालुक्यातील खंडाळा ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर ढोके यांनी गटशिक्षणाधिकाऱ्याकडे लेखी तक्रार दिली. दरम्यान, संतप्त पालकांनी शाळेला कुलूप ठोकले असून संबंधित शिक्षिकेची तातडीने बदली करावी, अशी मागणी केली. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांचा मुलगा दुपारी शाळेतून अचानक घरी आला. घरी पोचताच मुलाने 'मॅडम' शाळेत झोपून असल्याची माहिती दिली. या गंभीर प्रकरणानंतर सुधीर ढोके थेट शाळेत पोहचले असता, संबंधित शिक्षिका झोपलेल्या अवस्थेत आढळून आल्या. तसेच पती शिक्षक नसतानाही थेट मुख्याध्यापकांच्या खुर्चीवर मद्यधुंद अवस्थेत बसून होता. विशेष म्हणजे मद्यधुंद अवस्थेत त्याने पालकांशी अरेरावी व दमदाटी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आईने प्रियकराच्या मदतीने पोटच्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीची २३ हजारांमध्ये विक्री केली. तिचे लग्नही लावून दिले. ही धक्कादायक घटना नागपूरातील केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी मुलीने हिंमत दाखविली म्हणून केळवद पोलिसांनी मुलीच्या आईसह प्रियकर व इतर सहकारी अशा आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. या मुलीचे आठवीपर्यंत शिक्षण झाले आहे. गेल्या दोन वर्षांपासून मुलीचे वडील विभक्त झाले. दोन महिन्यांपासून मुलीच्या आईचे एका युवकासोबत अनैतिक संबंध होते. शुक्रवारी १७ जुलै २०२६ ला सकाळी या प्रियकराने मुलीच्या आईच्या मोबाइलवर संपर्क साधला. मुलीसह तिला भेटायला बोलावून आपल्या योजनेला पूर्णविराम दिला.

अशा कित्येक घटना दररोज ऐकायला मिळतात आणि नजरे समोरून जातात. ऐकलेल्या गोष्टींवर क्षणभर विश्वास बसत नाही. कारण मनाला सत्याची पुष्टी होत नाही. पण जेव्हा तिच गोष्ट नजरे समोरून जाते, तेव्हा आपसुकच मनावर विश्वासाचा मुलामा चढतो. यातील ब-याच घटनांचे त्यांच्या परिणामानुसार दुःखाची सीमा निश्चित होते. परंतु हृदयद्रावक, काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेने मनही हुंदके द्यायला लागते आणि अश्रूंना वाट फुटते. मग साहजिकच मन विचारांच्या वावटळात फिरू लागते आणि स्वतःलाच प्रश्न करते. खरंच ही संतांची भूमी असलेला महाराष्ट्र आहे का?

# धोरणांपासून वर्गखोलीपर्यंतचा प्रवास अजूनही अपूर्ण!

## दर्जेदार शिक्षण हा आर्थिक क्षमता असलेल्या कुटुंबांचाच विशेषाधिकार बनत आहे का?

**अश्विनी सागर खापर्डे**
**नागपूर**

सध्या देशभरात शिक्षण, विकास आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांबाबत विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या चर्चांमुळे शिक्षण व्यवस्थेच्या वास्तवाकडे नव्याने पाहण्याची गरज अधोरेखित होत आहे. संशोधन विद्यार्थी म्हणून महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करताना असे प्रकर्षाने जाणवते की, धोरणांची कमतरता नसतानाही त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीत अनेक अडथळे अजूनही कायम आहेत.

ग्रामीण भागातील अनेक सरकारी शाळांमध्ये आजही शिक्षकांची रिक्त पदे, अपुऱ्या पायाभूत सुविधा, डिजिटल साधनांची मर्यादित उपलब्धता, विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील गुणवत्तेची दरी आणि प्रशासकीय अडचणी यांसारखी आव्हाने मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. अनेक शिक्षक अत्यंत समर्पितपणे काम करत असले, तरी अध्यापनासोबत निवडणुका, जनगणना, विविध शासकीय सर्वेक्षणे, नोंदवहीचे काम आणि इतर अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा मोठा भार त्यांच्यावर असतो. परिणामी विद्यार्थ्यांना आवश्यक तेवढा वेळ, वैयक्तिक लक्ष आणि सातत्यपूर्ण अध्यापन देणे अनेकदा कठीण होते. त्यामुळे ही समस्या शिक्षकांच्या क्षमतेची नसून, शिक्षण व्यवस्थेच्या रचनेची आणि अंमलबजावणीची आहे.

याच कारणांमुळे अनेक पालक खासगी शाळांकडे वळताना दिसतात. नियमित अध्यापन, तुलनेने चांगल्या सुविधा, इंग्रजी माध्यम, तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्तरदायित्वाची भावना या अपेक्षांमुळे खासगी शिक्षणाविषयी आकर्षण वाढत आहे. परंतु यामुळे एक गंभीर प्रश्न निर्माण होतो. दर्जेदार शिक्षण हा आर्थिक क्षमता असलेल्या कुटुंबांचाच विशेषाधिकार बनत आहे का?

शिक्षण हा नफा कमावण्याचा उद्योग नसून सामाजिक परिवर्तन, समान संधी आणि लोकशाही बळकट करण्याचा पाया आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक मुलाला समानतेने मिळाले पाहिजे; ते पालकांच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असता कामा नये. सरकारी शिक्षण व्यवस्था ही समाजातील सर्व घटकांना समान संधी देणारी सर्वात महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यामुळे तिच्यावरचा समाजाचा विश्वास पुन्हा निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP-2020), समग्र शिक्षा अभियान आणि इतर शासकीय योजना निश्चितच आशादायी आहेत. मात्र त्यांचे यश कागदावरील उद्दिष्टांमध्ये नव्हे, तर प्रत्येक गावातील शाळेत, प्रत्येक वर्गखोलीत आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या अनुभवात दिसले पाहिजे. शिक्षकांना अध्यापनासाठी अधिक वेळ, शाळांना आवश्यक मनुष्यबळ व पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे हेच खऱ्या अर्थाने शिक्षण सुधारणेचे मोजमाप ठरेल.

विकसित भारताचा मार्ग संसदेत तयार होणाऱ्या धोरणांतून सुरू होतो; पण तो पूर्णत्वाला जातो तो गावातील वर्गखोलीत. त्यामुळे धोरणांपासून वर्गखोलीपर्यंतचा हा प्रवास जितका सक्षम, तितकाच भारताचा भविष्यकाळही सक्षम असेल.




**- संशोधन विद्यार्थी, लोकप्रशासन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

# राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये एक वर्षाकरिता आकांक्षित तालुका कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर सन २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नीति आयोगाने देशातील दुर्लक्षित व मागासलेल्या ११२ जिल्ह्यांमध्ये आकांक्षित जिल्हा कार्यक्रम व ५०० अल्प विकसित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केलेला आहे. त्यामध्ये राज्यातील ४ जिल्हे व २७ तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यांचे आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि आणि संलग्न सेवा, मूलभूत पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रातील ३९ निर्देशांक यांच्या आधारे कामगिरीचे मूल्यमापन केले जाते व त्यासाठी आयोगाकडून विशेष निधी दिला जातो. याच धर्तीवर महाराष्ट्राने संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा विस्तार केला असून त्यांमध्ये गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव, वाशिम, हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या १० जिल्ह्यांची व एकूण १७७ तालुक्यांची विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके म्हणून निवड केली आहे. या नव्याने निवड करण्यात आलेल्या १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये सन २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली. या तालुक्यांना या वर्षासाठी ५ कोटी रूपयांचा निधी देण्यात येईल. या वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना सन २०२७-२८ मध्ये अतिरिक्त प्रोत्साहन निधी देण्यात येईल. हा निधी पुरस्कार स्वरूपात पहिल्या पुरस्कारासाठी १० कोटी, दुसऱ्या पुरस्कारासाठी ८ कोटी, तिसरा-६ कोटी, चौथा-४ कोटी आणि पाचवा पुरस्कार २ कोटी रूपयांचा असेल. याशिवाय सर्व क्षेत्रातील एकत्रित कामगिरीच्या आधारे पुरस्कार दिला जाईल. यात पहिला पुरस्कार २१ कोटी, दुसरा पुरस्कार-१५ कोटी आणि तिसरा पुरस्कार-११ कोटी रूपयांचा असेल.

या तालुक्यांच्या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अशा संनियंत्रण समित्या स्थापन केल्या जातील.

**नागपूरच्या काटोल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय**

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी संलग्न शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नागपूर व अमरावती विभागातील ११ जिल्ह्यांमध्ये संत्रा, मोसंबी, आंबा, लिंबू, पेरू इत्यादी व मुख्य फळ पिकाव्यतिरिक्त कमी पाण्यावर तग धरणारी आवळा, सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर नागपूर जिल्ह्यातील फळे, भाजीपाला व फुलशेतीची विविधता बघता उद्यानविद्या महाविद्यालयाची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामध्ये फळे, भाजीपाला, फुले तसेच, प्रक्रिया व मूल्यवर्धन या संबंधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश असल्याने त्यासंबंधीच्या अभ्यास व संशोधनाला चालना मिळणार आहे.

दरवर्षी या महाविद्यालयात १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय २९ पदे आणि शिक्षकेतर नियमित २२ पदे अशी एकूण ५१ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचबरोबर शिक्षकवर्गीय (गट अ) (५) आणि शिक्षकेतर (गट क) (८) व (गट ड) (२२) ची पदे आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपात भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पदांसाठी आवश्यक वेतन व अनुषंगिक खर्चासाठी १२२ कोटी ३२ लाख रूपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली.

**एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे येथे तीन हेक्टर जमीन**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल-एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे (ता.मावळ) येथील तीन हेक्टर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मौजे सदुंबरे येथील गायरानातील तीन हेक्टर जमीन एनडीआरएफला बाजारभावाने देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यावर या संस्थेने जनहित तथा राष्ट्रीय महत्त्व या कारणास्तव संस्थेस ही जमीन विनामूल्य मिळावी, अशी मागणी केली होती. या जमिनीवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी तळ उभारण्यात येणार आहे. जिथे आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध प्रशिक्षणांसह, विविध स्वरूपाच्या आपत्तींवर मात करण्यासाठीची कृतीदले तैनात राहणार आहेत. यामुळे राज्यात आपत्कालीन स्थितीत उपाययोजना करता येणार. या दृष्टीने देशातील एकमेव अशा समर्पित नागरी दल म्हणून एनडीआरएफला ही जागा विनामूल्य भोगवटादार वर्ग-२ म्हणून मान्यता देण्यात येणार आहे.

**भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूर येथील जमीन भाडेपट्टयावरील मुद्रांक शुल्क माफ**

मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूरमधील सुभाष रोड जागेच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ ही सार्वजनिक धमार्दाय संस्था आहे. ही संस्था राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभक्ती तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवीत असते. या संस्थेला नागपूर मधील सुभाष रोड येथील १८ हजार ३४० चौ.फूट जागा शासनाने १९५४ मध्ये भाडेपट्टयावर उपलब्ध करून दिलेली आहे. या संस्थेने विनंती केल्यानुसार भाडेपट्टयाच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क लोकहितास्तव माफ करण्याचा प्रस्ताव होता. त्यास आज मान्यता देण्यात आली.

**लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता**

लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

लोक आयुक्त व उपलोक आयुक्त कार्यालयाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या दोन्ही कार्यालयांसाठी यापूर्वी ८७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. आता राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम २०२३ लागू केला आहे. या अधिनियमानुसार लोक आयुक्त संस्थेतील सदस्यांमध्ये वाढ झाली असून त्यांच्या अधिकार क्षेत्रातही वाढ झाली आहे. त्यामुळे या कार्यालयाला प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार सध्याची मंजूर पदे ८७ अधिकची ५६ पदे (३१ नियमित, २३ बाह्ययंत्रणेद्वारे आणि २ माहिती तंत्रज्ञान कर्मचारी) अशा एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.

## थोडक्यात

### कोदामेंढी येथे आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

बुधवार (ता.२२ जुलै) रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत लाईफ लाईन ब्लड बँक भंडारा यांच्या सहकार्याने कोदामेंढी



येथील गर्देश्वरी मंदिर परिसरात भाजपा मौदा तालुका व मौदा शहर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे करणार असून कार्यक्रमाला माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा अध्यक्ष नागपूर ग्रामीण आनंदराव राऊत , भाजपा महामंत्री नागपूर ग्रामीण अनिल निधान, प्रदेश कार्यकारणी सदस्य अशोक हटवार, मौदा नगरपंचायत नगराध्यक्ष प्रसन्ना (राजा) तिडके ,माजी भाजपा तालुका अध्यक्ष मुकेश अग्रवाल, संजय गांधी निराधार योजना समिती तालुकाध्यक्ष रामेश्वर लिचडे, तालुका समन्वय समिती सदस्य नरेश बावनकुळे, ग्रामपंचायत कोदामेंढी उपसरपंच गोपाल गिरमेकर उपस्थित राहणार आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याने,आपल्या एका रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते. समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडत सर्व नागरिक युवक-युवती,महिला तसेच भारतीय जनता पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या पवित्र सामाजिक उपक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून मानवसेवेच्या या पुण्यकार्याला हातभार लावावा, असे आव्हान भाजपा मौदा तालुकाध्यक्ष भगवान बावनकुळे, भाजपा मौदा शहराध्यक्ष मोरेश्वर सोरते, तालुका समन्वय समिती अध्यक्ष तथा भाजपा मौदा तालुका प्रभारी नरेश मोटधरे यांनी केले आहे.

### खंडाळा (गांगनेर) येथील एनजीपी ॲग्रोटेकचे संचालक डॉ. निशांत बरबटे यांना विदर्भरत्न पुरस्कार

**सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रदान**



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

रविवार (ता. १९ जुलै) रोजी रेसिल डॉट इन यांनी नागपूर येथील रेडिसन ब्ल्यू या हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये कृषी क्षेत्रात उत्कृष्ट भरारी व शेतकऱ्यांना दिलेले दहा वर्ष सेवेबद्दल मौदा तालुक्यातील खंडाळा (गांगनेर ) येथील एनजीपी अँग्रोटेकचे संचालक डॉ. निशांत बरबटे यांना सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते विदर्भ रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.डॉ. निशांत बरबटे हे ग्रामीण क्षेत्रातील असून शेतकऱ्यांबद्दल असलेली त्यांची तळमळ आणि सतत नव नवीन प्रयोग हे त्यांना काम करण्यात बळ देते.

शेतकऱ्यांना महागाईच्या युगामध्ये शेती नवीन तंत्रज्ञानाने कशी करायची आणि कसे सुष्म अन्नद्रव्य अवलंब करायचे आणि आपले पारंपरिक पिकाच्या व्यतिरिक्त नवीन पिक कशी घ्यायची, याबद्दल ते शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात व आपल्या कंपनीमध्ये असलेल्या प्रयोगशाळेतून शेतकऱ्यांना माती परीक्षण, पाणी परीक्षण हे मोफत उपलब्ध करून देत असतात.ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये असलेल्या अचूक घटकांबद्दल माहिती होते आणि शेती करण्यास त्यांना त्याच्या फायदा होतो, हे विशेष! याप्रसंगी विदर्भातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे उद्योजक उपस्थित होते.

### सुदर्शन, वाल्मिकी व मखियार समाज व संघटनांच्या माध्यमातून आज 'सेवा गौरव दिन'

**महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांची पत्रकारपरिषदेत माहिती**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्वच्छतेसाठी ऊन, तहानभूक विसरुन आयुष्यभर योगदान देणाऱ्या सफाई कामगारांच्या कष्टाचा गौरव व्हावा याउद्देशाने २२



जुलै रोजी भव्य सेवा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. इमामवाडा आयसोलेशन हॉस्पीटलच्या परिसरात होणाऱ्या या कार्यक्रमास पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यसभा सदस्य मायाताई इवनाते, महापौर निताताई ठाकरे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रविण दटके, संजय भेंडे, माजी खासदार अजय संचेती आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुदर्शन, वाल्मिकी मखियार समाजासाठी दिलेले योगदान मोठे आहे. लाडपागे समितीच्या अहवालाची काटेकोर अंमलबजावणी करुन त्यांनी सफाई कामगारांना मोठ्या प्रमाणात न्याय दिलेला आहे. सफाई कामगारांच्या मुलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात व्यापक प्रमाणात विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न सुरु असल्याचे ते म्हणाले. सामाजिक न्याय विभाग व इतर विभागांच्या समन्वयातून २२ जुलै रोजी एकूण १२०० व्यक्तींना ई-रिक्षा, शिलाई मशिन व सायकलचे वितरण केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी दिली. या १ हजार २०० लाभधारकांमध्ये आपण जाणीवपूर्वक महिलांचाही अंतर्भाव केला आहे. सुमारे पाचशे महिलांना शिलाई मशिन वाटप केले जाणार असून त्यांना याबाबतचे प्राथमिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिक्षणमहर्षी बाबुरावजी झाडे यांचे निधन

### मेडिकल येथे देहदान संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष व जीवनविकास एज्युकेशन सोसायटी, सिरसपेठ, नागपूर या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव लहानुजी झाडे यांचे दि. २१ जुलै रोजी सकाळी ७ वाजता. वयाच्या ८८ व्या वर्षी, वृद्धापकाळामुळे निधन झाले. १९३८ ते २०२६ पर्यंतचा त्यांचा प्रवास आज संपला. मृत्यूनंतरही त्यांचे शरीराचा मेडिकलचे विद्यार्थ्यांना शिक्षणात लाभ व्हावा यासाठी त्यांनी मृत्यूपूर्वीच देहदान करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार त्यांचे नागपुरातील नंदनवन, येथील घरी, व आयुर्वेदिक लेआऊट, व सिरसपेठ येथील नवप्रतिभा हायस्कूल, व कनिष्ठ महाविद्यालयाचे पटांगणात त्यांचे चाहते, नातेवाईक, मित्रमंडळी, शिक्षक, विद्यार्थी यांनी अंतिम दर्शन घेतल्यानंतर त्यांची अंत्ययात्रा सरळ मेडिकल कॉलेज परिसरात नेऊन त्यांचे इच्छेनुसार देहदान करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, माजी मंत्री सर्वश्री श्री रणजितबाबू देशमुख, विनोद गुढघे पाटील, राजेंद्र मुळक,आमदार अभिजीत वंजारी, माजी आमदार, एस.क्यू,जामा, अशोक धवड,गिरीश पांडव प्रफुल गुढघे, गंगाधर रेवतकर, रवींद्र फडणवीस, श्रीराम काळे, जवदंड सर, अतुल देशमुख, सूरज इटणकर, संस्थेचे कोषाध्यक्ष बळवंत मोरघडे, उपाध्यक्ष वसंत झाडे तसेच त्यांचे पुत्र सर्वश्री राजेंद्र, प्रवीण, नितीन झाडे, सर्वसुना व नातवंड सर्वश्री मोहनीश, दुष्यंत, रोहन, डॉ. देवयानी, साहिल, तपस्या झाडे तसेच मोठा आप्तपरिवार, शिक्षक वृंद, विद्याथी अंतिम दर्शनासाठी शाळेत हजर होता.

स्व. झाडे हे मूळचे कावरापेठ, उमरेड येथील शेतकरी कुटुंबातील असून, त्यांनी नागपुरात येऊन, शिक्षण घेत असता वयाच्या अवघ्या २१ वर्षी



सन १९६० ला शिक्षण संस्थेची स्थापना करून शहरातील मागासभागातील, ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर यांचे मुला मुलींना चांगले शिक्षण घेता यावे म्हणून संस्थेद्वारे त्या त्या भागात शाळा सुरू करून शिक्षणाचे कार्य सुरू केले. त्यांचे संस्थेत केजी ते पीजी पर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्रासाठी वाहून घेतले होते,म्हणून त्यांना शिक्षणमहर्षी ही म्हटल्या जात असे.

ते एम.ए, बी.एड., एलएलबी पर्यंत शिकले होते. ते नागपूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाचे अध्यक्ष, व मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ही होते. माजी शिक्षणमंत्री स्व. सुरेशबाबू देवतळे यांचे नेतृत्वात १५ वर्षं ते नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटी सरचिटणीस, शेवटी चार वर्ष जिल्हाध्यक्ष म्हणून काम करून त्यांनी काँग्रेस पक्षाची ग्रामीण भागात पकड निर्माण केली. ते ११ वर्ष नागपूर जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून कार्यरत होते. या माध्यमातून त्यांनी समाजाची सेवा केली. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण, शेतकरी, गरीब, गरजू यांच्या मुलांना नोकरी देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावला. अशाप्रकारे आयुष्यभर त्यांनी आपले जीवन, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रासाठी खर्ची घातले.

शिक्षणक्षेत्रात क्रांती होऊन सर्वच समाजातील मुलामुलींना उच्च,योग्य शिक्षण मिळावे, व मराठी माध्यमांच्या शाळा टीकाव्यात यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केलीत.चर्चा सत्र घेतलीत.अशाप्रकारे एका यशस्वी जीवनाचा आज अंत झाला. त्यामुळे अनेकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

### मधमाशीपालनासाठी खादी व ग्रामोद्योग विभागाकडून ५० टक्के अनुदान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेती पिके व फळबागांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी मधमाशीपालन हा अत्यंत उपयुक्त शेतीपूरक व्यवसाय असून, त्यासाठी खादी व ग्रामोद्योग विभागामार्फत ५० टक्के अनुदान उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत मधकेंद्र योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येत असून इच्छुकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग कार्यालयाने केले आहे. या योजनेअंतर्गत मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्य खरेदीसाठी ५० टक्के अनुदान व ५० टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मधखरेदी, विशेष छंद प्रशिक्षणाची सुविधा तसेच मधमाशी संरक्षण व संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात येते. या योजनेसाठी व्यावसायिक मधपाळ, केंद्रचालक प्रगतिशील मधपाळ तसेच केंद्रचालक संस्था पात्र आहेत.

वैयक्तिक मधपाळ हा साक्षर असावा व त्याचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असावे. स्वतःची शेती असल्यास त्याला प्राधान्य दिले जाईल. केंद्रचालक प्रगतिशील मधपाळासाठी किमान दहावी उत्तीर्ण, वय २१ वर्षांपेक्षा अधिक तसेच स्वतःच्या किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावावर किमान एक एकर शेती अथवा भाडेतत्त्वावरील शेती असणे आवश्यक आहे. शिवाय मधमाशीपालन, प्रजनन व मध उत्पादनाविषयी लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी. केंद्रचालक संस्थेसाठी संस्था नोंदणीकृत असणे, संस्थेच्या नावावर अथवा भाडेतत्त्वावरील किमान १ हजार चौरस फूट सुयोग्य इमारत असणे तसेच मधमाशीपालन, प्रजनन व मध उत्पादनाविषयी लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. लाभार्थी निवड प्रक्रियेनंतर प्रशिक्षणापूर्वी मध व्यवसाय सुरू करण्यासंबंधी मंडळास बंधपत्र देणे बंधनकारक असून, मंडळाने निश्चित केलेल्या ठिकाणी प्रशिक्षण घेणेही अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, उद्योग भवन, ६ वा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे संपर्क साधावा.

# इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या नव्या अध्यक्षा डॉ. पूजा साओजी तर मानद सचिव पद्मा देशराज यांची निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनर व्हील क्लब ऑफ नागपूरच्या २०२६-२७ या वषासाठीच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा अमृतभवन, नॉर्थ अंबाझरी येथे उत्साहपूर्ण संपन्न झाला. या सोहळ्यात डॉ. पूजा साओजी यांनी अध्यक्षा, तर पद्मा देशराज यांनी मानद सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इनर व्हील डिस्ट्रिक्ट चेअरमन सौ. मनीषा चौधरी होत्या, तर व्ही.आय.ए - एल. ई. डब्ल्यू.च्या अध्यक्षा सौ. योगिता देशमुख या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी समाजसेवेत उल्लेखनीय योगदाना बद्दल डॉ. विभावरी दाणी यांचा डॉ. भाग्यलक्ष्मी राजन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट महिला उद्योजिका म्हणून जुई मेशणकर यांना डॉ. हर्षा झारिया यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्षा डॉ. पूजा साओजी, इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट सुप्रिया जोशी, उपाध्यक्षा शर्मिला आनंद, मानद सचिव पद्मा देशराज, खजिनदार रुचिका वानखेडे, आय. एस. ओ. अंशू शुक्ला, सी.सी. डॉ. मीनल दवंडे, क्लब सल्लागार डॉ. भाग्यलक्ष्मी राजन, इनर व्हील इन्फॉर्मेशन कोऑर्डिनेटर सौ. प्रतिभा कुलकर्णी यांचा समावेश आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून अर्चना मराठे, डॉ. चारू धर्माधिकारी, डॉ. हर्षा झारिया, डॉ. प्रज्ञा गिजरे, सुषमा सातोकर आणि डॉ. वंदना बारस्कर यांची निवड करण्यात आली.

इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट सुप्रिया जोशी यांनी २०२५-२६ या वर्षात क्लबने राबविलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचा आढावा सादर केला. नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. पूजा साओजी यांनी आपल्या मनोगतात सेवा, मानवता आणि सामाजिक बांधिलकी जपत क्लबचे कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त केला. पी.डी.सी. मीना कुलकर्णी यांनी वंचित व गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करण्याचे आवाहन केले. डिस्ट्रिक्ट चेअरमन मनीषा चौधरी यांनी महिला सक्षमीकरणावर मार्गदर्शन करत जिल्ह्याची नवीन थीम "आयका" याविषयी माहिती दिली.

तसेच योगिता देशमुख यांनी इंटरनॅशनल इनर व्हीलच्या "Reach and Inspire" U "Grow and Flouris" या संकल्पनांचे महत्त्व अधोरेखित करत समाजहिताचे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना मराठे व प्रतिभा कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शर्मिला आनंद यांनी मानले.

दैनिक सिंहवाणी वृत्त


थोडक्यात

## दर्जेदार सेवा व सुरक्षेसाठी आज वीजपुरवठा बंद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूरः** वीज ग्राहकांना अखंडित आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा, या उद्देशाने महावितरण नेहमीच कटीबद्ध असते. याच उपक्रमाचा भाग म्हणून, बुधवार, दिनांक २२ जुलै रोजी एबीस्विच बसवणे, री-जंपरिंग', झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम, जुनी यंत्रणा काढणे, रस्ता रुंदीकरणासाठी वाहिनी स्थलांतर. रिंग मेन युनिट चार्जिंग आणि नियोजित देखभाल आणि दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामांमुळे महाल विभागातील काही भागात तर कॉंग्रेसनगर विभागात नियमित देखबाल व दुरुस्तीच्या कामांमुळे सकाळच्या सत्रात वीजपुरवठा बंद राहील. या कामांमुळे महाल विभागात सकाळी ९ ते १२ या वेळेत नंदनवन मेन रोड, मंगलमूर्ती चौक, कीर्ती स्वीट रोड, नंदनवन, वुमेन्स कॉलेज, भांडे प्लॉट चौक, कबीर नगर, मिरे लेआउट, बापू नगर, शितल माता मंदिर या भागात, सकाळी ८ ते १२ या वेळेत तपस्या कॉन्व्हेंट. आकाश नगर, अवधूत नगर, विज्ञान नगर, शेष नगर, महाकाली नगर या भागात, सकाळी ७ ते ११ या वेळेत विणकर वसाहत, आर्य कार शोरूम, साउथ पॉइंट स्कूल, इन्फिनिटी क्लिनिक, कल्याणेश्वर नगर, गीता नगर, वनराई नगर, परिवर्तन चौक, दिवाण लेआउट या भागात, सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत गुजरवाडी, चांडक लेआउट, कॉटन मार्केट चौक या भागात तर, सकाळी ८ ते ११ या वेळेत दर्शन कॉलनी, गंगाबाई घाट, गंगा विहार, व्यंकटेश नगर या भागातील वीजपुरवठा बंद राहील.

नियोजित देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांमुळे कॉंग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते १० या वेळेत ऑरेंज सिटी. कालीमाता या भागात, सकाळी ७.३० ते ११ या वेळेत शिवाजी पार्क भागात, सकाळी ८ ते ११ या वेळेत एकात्मता नगर, डोंगरे लेआउट, अभिजीत सोसायटी, पूजा लेआउट,दादाजी नगर, वानखेडे लेआउट, राही कॉलनी, ऑर्बिटल एम्पायर, जेतवन सोसायटी, दिनदयाल नगर, मिलानियम जिम, लोकसेवा नगर, सुजाता लेआउट, अग्ने बिल्डिंग, गांधी बिल्डर, प्रियदर्शनी नगर, बाहुबल लेआउट, गुडधे लेआउट, एकलव्य लेआउट, पागे अपार्ट्मेंट, एनआयटी लेआउट, त्रिमूर्ती नगर, भामटी, गेडाम लेआउट, एचआयजी-८२ या भागातील तर सकाळी ७ ते ११ या वेळेत राय इम्पीरियल, ऑर्किड, पायनियर, ग्रीन लॉन, शाहु नगर, नारायण विद्यालय, रचना अपार्ट्मेंट, एचपी पेट्रोल पंप, राजाराम नगर, चिखली आणि खापरी नाका या भागातील वीज पुरवठा बंद राहील. याशिवाय बुटीबोरी विभागात १० ते दुपारी २ या वेळेत ए झोन फेज २ मधील औद्योगिक ग्राहकांचा वीज पुरवठा बंद राहील. ही कामे पूर्ण झाल्यानंतर वीजपुरवठा त्वरित पूर्ववत करण्यात येईल. देखभाल आणि दुरुस्तीच्या या कामामुळे भविष्यात पावसाळ्यात होणारे बिघाड टाळण्यास आणि वीज पुरवठ्याची विश्वासार्हता वाढवण्यास मोठी मदत होणार आहे. महावितरण प्रशासनाने या कालावधीत ग्राहकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. तांत्रिक कामे सुरळीत पार पाडण्यासाठी आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी हा वीजपुरवठा खंडित करणे आवश्यक आहे, याची ग्राहकांनी कृपया नोंद घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरती

### हनुमान मंदिरात ५६ दिव्यांची दिवाळी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांचा उद्या २२ जुलै रोजी वाढदिवस असून यानिमित्ताने भाजप नेत्या व नगरसेविका प्रगती पाटील यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी म्?हणजे पूर्व संधेला मौजा-अंबाझरी (हिंगणा-कवडस रोड) येथील श्री हनुमान मंदिरात भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व भक्तांनी एकत्र येऊन ५६ दिव्यांची भव्य महाआरती केली. संपूर्ण मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने न्हाऊन निघाला. वातावरणात भक्तिमय आणि उत्साही ऊर्जा भरली होती. कार्यक्रमाला मोठ्या संख्येत उपस्थित नागरिकांनी मुख्यमंत्री देवाभाऊ यांच्या दीघार्युष्यासाठी व निरोगी आरोग्यासाठी मनोभावे प्रार्थना केली.

प्रगती पाटील यांनी कार्यक्रमात सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. कृषी महिला सन्मान बिल आणि शेतकरी कर्जमाफी यामुळे ग्रामीण भागातील महिलांना व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. देवा भाऊ हे शेतकऱ्यांचे, महिलांचे आणि विकासाचे नेते आहेत. महाआरतीच्या निमित्ताने देवाभाऊंना शुभेच्छा देण्यात आल्याचे त्या म्हणाल्या.

## मुंबईसह पुणे घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट

**वृत्तसंस्था, मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रभर विस्कळीत स्वरूपाचा पाऊस झाला. आता मुंबई, कोकण किनारपट्टीसह मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात जोरदार पावसाचे इशारे देण्यात आले आहेत. २१ जुलै ते २६ जुलैपर्यंत कोकण ,गोवा, मध्य महाराष्ट्रात जोरदार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. सध्या गुजरात किनारपट्टीवर असलेल्या कमी दाबाच्या पट्टूयामुळे महाराष्ट्राचा उत्तर भागात आणि विदर्भाच्या पूर्व भागांमध्ये चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर तसेच पुणे व सातारा घाटमाथ्यावर पावसाचे ऑरेंज अलर्ट देण्यात आले आहेत.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २१ ते २५ जुलै दरम्यान नैऋत्य मोसमी वारे गुजरात आणि उत्तर महाराष्ट्रावर कायम राहणार आहेत. परिणामी, कोकण गोवा, मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांसह उत्तर महाराष्ट्रात मुसळधार त्याला ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. पूर्व विदर्भात ही पावसाचा जोर वाढणार असून पुढील दोन ते तीन दिवस महाराष्ट्रात विविध ठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत.

# न्यायालयीन प्रकरणांच्या सामंजस्याने निपटारासाठी मध्यस्थीचा मार्ग अधिक प्रभावी

### न्या. प्रवीण एम. उन्हाळे यांचे प्रतिपादन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

न्यायालयीन प्रकरणांची वाढलेली संख्या व न्यायदानासाठी आवश्यक असलेला कालावधी याचा विचार करता कोणत्याही प्रकरणांमध्ये मध्यस्थीच्या मार्गाने सामोपचाराने घेतलेला निर्णय अधिक हिताचा ठरतो. यात दोन्ही पक्षाच्या बाजूने सहमती असल्याने यात कलुषीत झालेल्या मनाना एक सकारात्मक वाट ही मिळते, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. प्रवीण एम. उन्हाळे यांनी केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष शेखर सी. मुनघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायालयाच्या सभागृहात आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

अनेकदा पक्षकारांना वर्षानुवर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागतो. यात वेळेबरोबर मोठा आर्थिक खर्च होतो. महत्त प्रयासाने जो निकाल मिळेल त्यात दोन्ही पक्षांना समाधान मिळेलच याची शाश्वती नसते. परस्पर संवाद आणि सामंजस्याच्या माध्यमातून मध्यस्थीचा पर्याय स्वीकारल्यास कोणताही वाद जलद, कमी खर्चात आणि सौहार्दपूर्ण पद्धतीने निकाली काढता येतो. यासाठी न्यायव्यवस्थेत मध्यस्थीचे महत्त्व अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश आर. पी. पांडे यांनी मध्यस्थीची संकल्पना विविध प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केली.

ज्येष्ठ विधिज्ञ तथा प्रशिक्षित मध्यस्थ राजेंद्र राठी यांनी आपल्या अनुभवातून सांगितले की, दोन्ही पक्षांमध्ये संवादाची आणि सहकायार्ची तयारी असेल तर मध्यस्थीच्या माध्यमातून अनेक वाद सहजपणे सोडवता येतात. व्यावसायिक प्रकरणांसाठी प्रशिक्षित मध्यस्थ तथा सनदी लेखापाल गणेरीवाल यांनी व्यापारी वादांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, व्यावसायिक प्रकरणांचा निकाल लागण्यासाठी अनेकदा १० ते १५ वर्षांचा कालावधी लागतो. उदाहरणार्थ, एखाद्याचे १० लाख रुपये अडकले आणि ते १५ वर्षांनी मिळाले, तर त्या रकमेचे मूल्य मोठ्या प्रमाणात घटलेले असते. या कालावधीत संबंधित व्यक्तीचा व्यवसायही बंद पडण्याची शक्यता असते. त्यामुळे मध्यस्थीच्या माध्यमातून तातडीने तोडगा निघाल्यास केवळ आर्थिक नुकसान टळत नाही, तर भविष्यातील व्यावसायिक संबंध आणि प्रगतीची दारेही खुली राहतात.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी आणि वकिलांसाठी प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मध्यस्थीविषयी उपस्थितांनी विचारलेल्या विविध व्यावहारिक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अँड. उन्नती बोबडे यांनी केले.

# चार वर्षांपासून पाण्यासाठी वनवास

- वृंदावन प्रधानमंत्री आवासमधील रहिवाशांचा संताप अनावर
- एनएमआरडीए, महापालिका आणि ऑरेंज सिटी वॉटरकडे वारंवार पत्रव्यवहार
- महसूल मंत्र्यांच्या निर्देशानंतरही प्रश्न कायम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

तरोडी (खुर्द) येथील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत खसरा क्र. ६२ मधील वृंदावन सहकारी गृहनिर्माण संस्थेतील शेकडो फ्लॅटधारकांना गेल्या चार वर्षांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. संबंधित यंत्रणांकडे वारंवार निवेदने, पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याने रहिवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रहिवाशांनी उपलब्ध करून दिलेल्या कागदपत्रांनुसार, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) ने २०२३ पासून महापालिका, जलप्रदाय विभाग आणि ऑरेंज सिटी वॉटर यांना अनेक वेळा पत्रे पाठवून या योजनेसाठी पाणीपुरवठा वाढविण्याची मागणी केली आहे. त्यामध्ये विद्यमान जलवाहिनीची क्षमता अपुरी असल्याने नागरिकांना आवश्यक प्रमाणात पाणी मिळत नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

एनएमआरडीएच्या २ जुलै २०२४ रोजीच्या पत्रानुसार, योजनेला दररोज सुमारे १४.१२ लाख लिटर पाण्याची आवश्यकता असून प्रत्यक्षात त्यापेक्षा कमी पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यासाठी स्वतंत्र पाणीमीटर बसविणे, मुख्य जलवाहिनीची क्षमता वाढविणे आणि अतिरिक्त पाणीपुरवठा करण्याची शिफारसही करण्यात आली होती.

यापूर्वी १६ मे २०२५ रोजी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीतही या प्रश्नाची गंभीर दखल घेण्यात आली होती. बैठकीतील निर्देशानुसार एनएमआरडीएने २२ मे २०२५ रोजी नागपूर महापालिकेच्या आयुक्तांना पत्र पाठवून आवश्यक पाणीपुरवठा तातडीने सुरू करण्याची विनंती केली. त्यानंतरही २३ मे २०२५ रोजी आणखी एक स्मरणपत्र पाठवून रहिवाशांच्या तक्रारींकडे लक्ष वेधण्यात आले. मात्र, या सर्व पत्रव्यवहारानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

**तीव्र आंदोलनाचा इशारा**

याच अनुषंगाने वृंदावन सहकारी गृहनिर्माण संस्थेने अलीकडेच पुन्हा जलप्रदाय विभागाकडे निवेदन सादर करून, मुख्य पिण्याच्या पाण्याच्या वाहिनीची क्षमता वाढविणे, स्वतंत्र जलवाहिनी उपलब्ध करून देणे आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करणे या मागण्या केल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी आश्वासने दिली; मात्र प्रत्यक्षात कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेऊन पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## सीम्स रिसर्च सेंटरची राष्ट्रीय एमआरयू क्षमता विकासासाठी निवड

### नागपूरच्या संशोधन संस्थेला राष्ट्रीय स्तरावर मोठी मान्यता

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जैववैद्यकीय संशोधन आणि संशोधन क्षमता विकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नागपूरच्या सीम्स-ॲडव्हान्स्ड रिसर्च सेंटर (सीम्स-एआरसी) ची भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब



कल्याण मंत्रालयाच्या आरोग्य संशोधन विभागाने राष्ट्रीय स्तरावरील मल्टिडिसिप्लिनरी रिसर्च युनिट (एमआरयू) क्षमता विकास उपक्रमासाठी मेंटर संस्था म्हणून निवड केली आहे. या निवडीमुळे नागपूरच्या संशोधन क्षेत्राला राष्ट्रीय स्तरावर मोठी मान्यता मिळाली आहे. या उपक्रमांतर्गत सीम्स-एआरसीचे संचालक डॉ. राजपाल सिंह कश्यप यांच्या नेतृत्वाखालील आयसीएमआर-कोलॅबोरेटिंग सेंटर ऑफ एक्सलन्स (सीसीओई) यांच्यावर मध्य प्रदेशातील एस.एस. मेडिकल कॉलेज, रीवा येथील एमआरयूला तीन दिवसीय 'ग्रँट रायटिंग अँड रिसर्च मेथडॉलॉजी' विषयावरील कार्यशाळेला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संशोधनाची गुणवत्ता वाढविणे, संशोधन पद्धती, वैज्ञानिक लेखन, संशोधन अनुदान प्रस्ताव तयार करणे, संशोधन नैतिकता, बायोस्टॅटिस्टिक्स, स्टडी डिझाइन आणि ट्रान्सलेशनल रिसर्च याबाबत प्राध्यापकांची क्षमता विकसित करणे, हा या राष्ट्रीय उपक्रमाचा उद्देश आहे.

या कार्यशाळेत एस.एस. मेडिकल कॉलेज, रीवा; गांधी मेडिकल कॉलेज, भोपाळ; एम्स भोपाळ; नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेज, जबलपूर आणि एमजीएम मेडिकल कॉलेज, इंदूर येथील प्राध्यापक सहभागी होणार आहेत. याबाबत डॉ. राजपाल सिंह कश्यप यांनी सांगितले की, आरोग्य संशोधन विभाग आणि आयसीएमआरद्वारे सीम्स-एआरसीवर राष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शनाची जबाबदारी सोपविणे, ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. या उपक्रमामुळे वैद्यकीय महाविद्यालयांमधील संशोधन कार्य अधिक सक्षम होईल, बहुविषयक संशोधनाला चालना मिळेल आणि राष्ट्रीय आरोग्यविषयक गरजांवर आधारित दर्जेदार संशोधन प्रस्ताव तयार करण्यास प्राध्यापकांना मदत होईल. डॉ. जी. एम. टावरी, प्रा. एच. एफ. दागीनावाला यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे, सीआयआयएमएस व्यवस्थापनाच्या पाठबळामुळे, संचालक डॉ. लोकेन्द्र सिंह यांच्या प्रोत्साहनामुळे आणि युवा संशोधन पथकाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

# स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सालेकसात २२ ते २८ जुलैदरम्यान भव्य जनसेवा सप्ताह

### वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, मॅरेथॉन, खेळाडूंचा गौरव, कृषी सन्मान, रक्तदान शिबिर व अल्पसंख्यांक संवादासह विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

स्व. अजितदादा पवार (मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सालेकसा येथे दि. २२ जुलै ते २८ जुलै २०२६ या कालावधीत 'जनसेवा सप्ताह' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. समाजहिताची भावना जोपासत पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, आरोग्य, क्रीडा, कृषी, सामाजिक ऐक्य आणि जनजागृती यांना प्राधान्य देत आठवडाभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांमध्ये विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, संपूर्ण तालुक्यात जनसेवेचा संदेश पोहोचविण्यात येणार आहे.

जनसेवा सप्ताहाची सुरुवात २२ जुलै रोजी वृक्षारोपण उपक्रमाने होणार आहे. तहसील कार्यालय सालेकसा, विद्यामंदिर विद्यालय रोंढा, पोलीस स्टेशन सालेकसा, पूर्ती पब्लिक स्कूल, वीर बिरसा मुंडा आश्रम शाळा सालेकसा तसेच मनोहरभाई पटेल महाविद्यालय सालेकसा येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जाणार आहे. २३ जुलै रोजी बसस्थानक परिसर सालेकसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व महात्मा गांधी स्मारक येथे श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश या उपक्रमातून नागरिकांना देण्यात येणार आहे.

२४ जुलै रोजी वनविभाग कार्यालय चौक ते औद्योगिक



प्रशिक्षण संस्था (आयटीआय), सालेकसा या मार्गावर भव्य मॅरेथॉन दौड स्पर्धा आयोजित करण्यात आली असून युवक-युवतींमध्ये आरोग्य, तंदुरुस्ती आणि क्रीडाभावना रुजविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे. २५ जुलै रोजी सालेकसा हायस्कूल येथे विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तालुक्यातील गुणवंत खेळाडूंना सन्मानित करून त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. २६ जुलै रोजी प्रगतिशील, प्रयोगशील तसेच महिला शेतकऱ्यांना "मा. अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार" प्रदान करून त्यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा गौरव करण्यात येणार आहे. आधुनिक शेती, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि कृषी विकासासाठी कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. २७ जुलै रोजी भाई रामसिंगजी गुरुद्वारा हॉल, स्टेशन रोड, सालेकसा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २८ जुलै शेवटच्या दिवशी सिंगलटोली, सालेकसा (मज्जिदसमोर) येथे "अल्पसंख्यांक सेवा संकल्प व संवाद" कार्यक्रम घेण्यात येणार असून सामाजिक सलोखा, बंधुता आणि परस्पर संवादाला चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या संपूर्ण जनसेवा सप्ताहाचे नियोजन व यशस्वी आयोजन करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते गेल्या काही दिवसांपासून तयारीत व्यस्त आहेत. राज्य सरचिटणीस ओबीसी आघाडी प्रभाकर दोनोडे, तालुका अध्यक्ष डॉ.अजय उमाटे, शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, महिला तालुका अध्यक्षा श्रीमती गीता चौधरी, महिला शहराध्यक्षा सुनीता थेर, युवक तालुका अध्यक्ष बाजीराव तरोने, तालुका अल्पसंख्याक अध्यक्ष नासीर अली, तालुका युवती अध्यक्षा श्रीमती सुषमा राऊत, रघुदास नागपुरे, ध्रुवकुमार हुकरे, जियालाल बघेले, ललित किरसान, उषाताई वऱ्हाडे, अहमद भाई पठाण, ओमप्रकाश लिल्हारे, सामाजिक न्याय विभागाचे राजू डोंगरे, जितेंद्र बडोले, संतोष नागपुरे, ओमप्रकाश जगणीत, अंकित मिश्रा तसेच बबलू मानकर हे पदाधिकारी जनसेवा सप्ताह यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेत असून प्रत्येक कार्यक्रमाचे नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन करण्यात येत आहे.

जनसेवा सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासणे, पर्यावरण संवर्धनाला चालना देणे, स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमांना प्रोत्साहन देणे तसेच शेतकरी, खेळाडू आणि समाजातील विविध घटकांचा सन्मान करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्याचे लोकाभिमुख व्यक्तिमत्वाच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी गायत्री मंदिर सभागृह, बाजार चौक, आमगाव खुर्द, सालेकसा येथे सकाळी ९.३० वाजता सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचे मोठे यश

लेखक



शंकर सालोडकर
सह-संपादक, नागपूर

### १६ मे २०१४- लोकसभा निवडणूक २०१४: प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचे मोठे यश

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या राजकीय मोहिमांमध्ये सक्रिय भूमिका बजावली होती. २०१३ मध्ये त्यांच्याकडे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. त्यामुळे त्यांचे महाराष्ट्रभर दौरे सुरू होते. केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्यावर भाजपच्या प्रचाराची जबाबदारी सोपवली होती. त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र पिंजून काढला अनेक ठिकाणी प्रचार सभा घेतल्या. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना एकत्र करून पक्ष संघटना बळकट करण्यावर भर दिला. त्यामुळे भाजपची ग्रामीण व शहरी भागांतील पकड मजबूत झाली. या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांनी गुजरातमध्ये राबवलेल्या मॉडेलची माहिती मतदारांपर्यंत पोहोचवली गेली. देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा-शिवसेना युती मजबूत ठेवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचबरोबर शेतकरी, तरुण, व्यापारी, महिला आणि शहरांतील मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचवली.

महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकांचे मतदान ४ टप्प्यांत पार पडले. यामध्ये पहिला टप्पा १० एप्रिल, दुसरा १७ एप्रिल, तिसरा २४ एप्रिल आणि चौथा ३० एप्रिलमध्ये पार पडला. त्यानंतर १६ मे २०१४ रोजी लागलेल्या निकालात महाराष्ट्रात भाजपा आणि शिवसेना युतीला मोठे यश मिळाले. भाजपाचे २३ तर शिवसेनेचे १८ असे एकूण ४१ खासदार जिंकून आले. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र भाजपने चांगले यश मिळवले. ज्यामुळे पक्षाची स्थिती मजबूत झाली आणि आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाचा मार्ग सुलभ होण्यास मदत झाली.

### ऑक्टोबर २०१४- विधिमंडळाच्या विविध समित्यांवर कार्यरत

विधानसभा आणि विधानपरिषदेच्या कामकाजात तसेच सरकारच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत विधानमंडळ समित्यांचे स्थान मोलाचे आहे. विधिमंडळ समित्या संसदीय लोकशाहीचा एक महत्त्वाचा भाग आहे. या समित्यांना कार्य करताना विशेष अधिकार प्राप्त असतात. विधानमंडळाचे कामकाज केवळ सभागृहातच चालत नाही, तर समित्यांच्या माध्यमातूनही चालत असते. देवेंद्र फडणवीस यांनी अंदाज समिती, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, स्थायी समिती - नगर विकास आणि गृहनिर्माण, संयुक्त समिती - राखीव निधी, संयुक्त समिती - स्वयं अर्थसहाय्यित शाळा, संयुक्त समिती - महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सदस्य - शेती विषयक उच्चाधिकार समिती, निति आयोग, नवी दिल्ली, या समित्यांवर प्रभावीपणे काम करत राज्यातील महत्त्वाच्या विषयांवर काम केले.

देवेंद्रजींनी २०१०-११ च्या कालावधीत विधानसभा विनंती अर्ज समितीच्या माध्यमातून नागपूर शहरातील मौजा परसोडी येथील कामगार कॉलनी आणि संत तुकडोजी नगर येथील नागरिकांना जमिनीचे मालकी हक्काचे पट्टे मिळवून दिले होते.

### १९ ऑक्टोबर २०१४- विधानसभा निवडणूक २०१४: देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाचे सर्वाधिक १२२ आमदार विजयी

२०१४ ची लोकसभा निवडणूक ही भारतीय राजकारणाच्या इतिहासातील एक निर्णायक घटना ठरली. केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला आणि त्याचे पडसाद संपूर्ण देशात उमटले. महाराष्ट्रही याला अपवाद नव्हता. या विजयामागे अनेक नेत्यांचे कष्ट होते, आणि त्यातीलच एक महत्त्वाचे नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यावेळी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष असलेले देवेंद्र फडणवीस हे स्टार प्रचारक म्हणून ठाम उभे राहिले. त्यांची प्रभावी भाषणशैली, अभ्यासू दृष्टिकोन आणि स्वच्छ प्रतिमेमुळे ते तरुण मतदारांमध्ये विशेष लोकप्रिय ठरले. त्यांनी विविध जिल्ह्यांमध्ये प्रचार दौरे घेतले. यातून भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्रात मोठा विजय मिळाला. नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाचे १२२ आमदार निवडून आले. भाजपाचा हा आतापर्यंतचा सर्वांत मोठा विजय आहे. नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांना १ लाख १३ हजार ९१८ मते मिळाली. त्यांनी ५८,९४२ मतांच्या फरकाने मोठा विजय मिळवला. हा फरक तब्बल ३०.८० टक्के इतका होता. त्यांच्या या विजयामागे लोकप्रियता आणि जनतेचा विश्वास दिसून येतो. या विजयातून देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले.

### ३१ ऑक्टोबर २०१४- देवेंद्र फडणवीस यांचा राज्याचे १८वे मुख्यमंत्री म्हणून शपथविधी

मुंबईतील वानखेडे स्टेडिअमवर देवेंद्र फडणवीस यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी राज्याचे १८ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ३१ ऑक्टोबर २०१४ ते १२ नोव्हेंबर २०१९ अशी ५ वर्षे १२ दिवस मुख्यमंत्री म्हणून राज्याचे नेतृत्व केले. मुख्यमंत्रीपदाचा ५ वर्षांचा कालावधी पूर्ण करणारे ते आतापर्यंतचे दुसरे मुख्यमंत्री ठरले आहेत. यापूर्वी वसंतराव नाईक यांनी ११ वर्षे ५८ दिवस मुख्यमंत्री म्हणून काम केले. मुख्यमंत्रीपदाचा ५ वर्षांचा कालावधी पूर्ण करणारे हे दोन्ही नेते विदर्भातील आहेत.

२०१४ मध्ये लोकसभेची निवडणूक झाल्यानंतर राज्यात १५ ऑक्टोबर २०१४ रोजी विधानसभेची निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीत राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतल्याने सर्व मतदारसंघात चौरंगी लढतीची चिन्हे दिसून आली. लोकसभेच्या निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडी मोडीत काढून विधानसभेच्या निवडणुकांना स्वतंत्रपणे सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे भाजपा आणि शिवसेना यांच्यातही जागावाटपावरून खडाजंगी झाल्याने या दोन्ही पक्षांनीही २५ वर्षांची युती मोडीत काढून स्वतंत्र निवडणुका लढवल्या. दरम्यान, २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीची जबाबदारी ही त्यांच्याकडेच आली. त्यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदाच भाजपाला महाराष्ट्रात १२२ जागांवर विजय मिळाला. देवेंद्र फडणवीस यांची स्वच्छ प्रतिमा ही त्यांची जमेची बाजू होती. त्यांच्यावर एकदाही भ्रष्टाचाराचा आरोप झालेला नाही. या निवडणुकीत कोणत्याच एका पक्षाला बहुमत मिळाले नाही. पण भारतीय जनता पक्षा सर्वाधिक १२२ जागा जिंकून पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनला. २००९ च्या निवडणुकीत भाजपाला अवघ्या ४६ जागा मिळाल्या होत्या. २०१४ मध्ये त्यात ७६ जागांची वाढ होऊन भाजपाला १२२ जागा मिळाल्या होत्या.

### ८ नोव्हेंबर २०१४- मुंबई कोस्टल रोडच्या कामाला गती

महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील सरकारच्या काळात अडकून पडलेल्या बान्द्रा-वसोर्वा लिंक, नरिमन पॉईंट झ्र कांदिवली कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक या प्रकल्पांना गती देण्याची घोषणा केली. यातील कोस्टल रोड हा प्रकल्प १९६० पासून चर्चेत असल्याचे बोलले जाते. मुंबई शहरातील वाहतुकीवरील ताण कमी करण्याच्यादृष्टिने हा अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश समुद्र किनाऱ्यालगत अत्याधुनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करून शहरातील वाहतूक व्यवस्थापन अधिक सुकर करणे हा आहे.



### ५ डिसेंबर २०१४- जलयुक्त शिवार अभियान - सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र

राज्यात सतत उद्भवणारी पाणीटंचाईची परिस्थिती विचारात घेऊन 'सर्वांसाठी पाणी - टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९' या कार्यक्रमांतर्गत दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्वांना एकत्रित करून, त्याचे योग्य पद्धतीने नियोजन करून जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी ५ डिसेंबर २०१४ पासून राज्यभरात जलयुक्त शिवार अभियान सुरू केले.

देवेंद्र फडणवीस यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर अवघ्या १५ दिवसांतच त्यांना राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागला. यातून मार्ग काढण्यासाठी आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापना केली. या समितीच्या माध्यमातून परिस्थितीचा आढावा घेऊन केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्तावर पाठवला. दरम्यान, राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात वेगवेगळ्या भागात यशस्वीरीत्या राबवलेल्या जलसंधारण योजनांचा अभ्यास केला. यामध्ये राळेगण पॅटर्न, शिरपूर पॅटर्न, हिवरेबाजार पॅटर्न अशा जवळपास २८ योजनांचा अभ्यास करून त्या जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून एकत्रितपणे राबवण्याचा निर्णय घेतला.

### ११ डिसेंबर २०१४- मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर अवघ्या महिन्याभरात मेट्रो २ प्रकल्पाला मंजुरी

काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या काळात ११ वर्षात अवघी ११ किमीची मेट्रो लाईन उभारली गेली. पण देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रो प्रकल्पांना चालना देऊन विकासाला आणखी गती दिली. त्यांनी फक्त मेट्रोचे प्रकल्प जाहीर केले नाहीत, तर ते वेळेत पूर्ण व्हावेत, यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ११ डिसेंबर २०१४ मध्ये मेट्रो लाईन २ प्रकल्पाला मंजुरी दिली. मेट्रो लाईन २ प्रकल्पांतर्गत दोन मुख्य लाईनचा समावेश होता. एक मेट्रो लाईन २ए जी डीएन नगर ते दहिसरपर्यंत आहे; आणि दुसरी मेट्रो लाईन २बी ही डीएन नगर ते मानखुर्द आहे.

### २८ एप्रिल २०१५- सर्वसामान्यांना मिळवून दिला सेवा हक्क!

राजकारणात नेत्यांनी दिलेली आश्वासने आणि त्या आश्वासनांचा पडलेला विसर याबद्दल आपण बरेच ऐकले आहे. पण एखादे आश्वासन स्वतःलाच देऊन ते पूर्ण करणारे देवेंद्र फडणवीस निराळेच नेते आहेत. राज्यात २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर भाजपा आणि शिवसेना युतीचे नेते म्हणून ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर १ नोव्हेंबर २०१४ ला झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत सेवा हमी अधिनियम (विविध सेवांची हमी देणारा कायदा) करण्याबाबत कायदा आणण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार फडणवीस सरकारने २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या संमतीने हा कायदा मंजूर करून घेतला. त्यानंतर राज्यपालांनी त्याला मान्यता दिल्यानंतर २८ एप्रिल २०१५ पासून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ हा कायदा महाराष्ट्रात अंमलात आला.

देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षात असताना २०११ मध्ये राज्यातील नागरिकांना सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा हक्क मिळावा, असा उद्देश असलेले 'महाराष्ट्र राज्य सेवा हमी' या नावाचे अशासकीय विधेयक विधानसभेत मांडले होते. त्या अशासकीय विधेयकावर विधिमंडळात २०१३ मध्ये चर्चा झाली. पण तत्कालीन सरकारने त्यावर जुजबी उत्तरे देत तो विषय गुंडाळला. पण देवेंद्रजींनी मात्र जिद्द सोडली नाही. २०१४ मध्ये राज्यात सत्तांतर झाले. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार गेले. सरकारचे प्रमुख म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली आणि पहिल्याच मंत्रिमंडळाच्या बैठकीत सेवा हमी अधिनियम मंजूर करून त्याचे कायद्यात रुपांतर केले.

### २९ मे २०१५- मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम: तरुणांच्या कल्पनांना प्रशासकीय बळ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१५ मध्ये मुख्यमंत्री फेलोशिप हा ११ महिन्यांचा उपक्रम सुरू केला. हा उपक्रम मुख्यमंत्री कार्यालयाद्वारे राबविला जातो. राज्यातील तरुणांना सरकारच्या विकास प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी, तसेच त्यांना प्रशासकीय कामांचा अनुभव देण्याच्या उद्देशाने २१ ते २५ वयोगटातील तरुणांसाठी मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम सुरू केला. या ११ महिन्यांच्या कालावधीत निवड झालेल्या उमेदवारांना स्टायपेंड व इतर भत्ते देण्याचा निर्णय घेण्यात आला. या फेलोशिप कार्यक्रमांतर्गत तरूणांना सरकारसोबत काम करण्याची संधी दिली गेली. सरकारने या फेलोशिप कार्यक्रमाचा शासन निर्णय २९ मे २०१५ रोजी प्रसिद्ध केला.




### ३१ जुलै २०१५- नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस-वे ची घोषणा

देवेंद्र फडणवीस यांनी ३१ ऑक्टोबर २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर वर्षभराच्या आत ३१ जुलै २०१५ रोजी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना सर्वप्रथम नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस-वे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली. मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे प्रमाणेच नागपूर-मुंबई असा एक महामार्ग व्हावा, अशी कल्पना देवेंद्रजींच्या मनात २० वर्षांपासून होती. ती त्यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर २०१५ मध्ये प्रथमच अधिकृतरीत्या विधानसभेत घोषित केली होती.

### ४ ऑक्टोबर २०१६- विशेष मंत्रिमंडळ बैठक: मराठवाड्यासाठी धडाकेबाज निर्णय

मराठवाड्यातील राजकीय नेत्यांकडून नेहमीच तिथल्या विकासाबाबत ओरड केली जाते. पण त्यावर उपाययोजना करण्याचे धैर्य एकाही नेत्याने दाखविलेले नाही. मराठवाड्यातील नेते दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी २००८ मध्ये मराठवाड्यातील प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी औरंगाबादमध्ये मंत्रिमंडळाची बैठक आयोजित केली होती. त्यानंतर तब्बल ८ वर्षांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४ ऑक्टोबर २०१६ मध्ये औरंगाबादमध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या बैठकीत मराठवाड्यातील सिंचन, जलसंधारण, शेती, पशु उद्योग, दुग्ध व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम, महसूल ग्राम विकास, पर्यटन, वने, उच्च व तंत्र शिक्षण, गृहनिर्माण, ऊर्जा आदी विभागाशी संबंधित एकूण २९ प्रकारचे निर्णय घेण्यात आले. या निर्णयातून मराठवाड्यासाठी ४९,२४८ कोटी रुपयांचा कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला. यामध्ये सिंचन ९२९१ कोटी, रेल्वे ५३२६ कोटी, रस्ते ३० हजार कोटी, विमानतळ २५० कोटी, सूक्ष्मसिंचन ४५० कोटी, कृषी/जलसंधारण १८८५ कोटी, उच्च शिक्षण ६०५ कोटी, वैद्यकीय शिक्षण १२० कोटी, वीज पुरवठा ११७५ कोटी आणि घरकुलसाठी १८० कोटी रुपयांचा कार्यक्रम निश्चित केला होता.

### ६ डिसेंबर २०१६- मराठवाडा वॉटरग्रीड: मराठवाड्यातील दुष्काळ इतिहास जमा होणार!

मराठवाड्यातील दुष्काळाची भीषणता लक्षात घेऊन २०१६ मध्ये फडणवीस सरकारने मराठवाडा वॉटर ग्रीडची घोषणा केली होती. दुष्काळग्रस्त व टंचाईग्रस्त मराठवाड्याचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी ही योजना सुरू केली होती. ही योजना मराठवाड्यातील एकूण ६४,५९० चौरस किमी क्षेत्रासाठी असणार आहे. या योजनेचा ७९ शहरं, ७६ तालुके आणि १२,९७८ गावांना लाभ होणार आहे. मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेंतर्गत मराठवाड्यातील ११ धरणे एकमेकांशी लूप पद्धतीने जोडली जाणार आहेत. त्यासाठी १३३० किलोमीटर लांबीची पाईपलाईन टाकली जाणार आहे. यात जायकवाडी (छत्रपती संभाजीनगर), येलदरी (परभणी), सिद्धेश्वर (हिंगोली), माजलगाव (बीड), मांजरा (बीड), ऊर्ध्व पैनगंगा (यवतमाळ), निम्न तेरणा (धाराशिव), निम्न मण्यार (नांदेड), विष्णुपुरी (नांदेड), निम्न दुधना (परभणी) आणि सीना कोळेगाव (धाराशिव) या धरणांचा समावेश आहे. मराठवाड्यात दुष्काळाचे सावट असताना पश्चिम महाराष्ट्रातील सांगली आणि कोल्हापूरमध्ये मात्र पावसाच्या पुराने थैमान घातले होते. एकीकडे भीषण दुष्काळ आणि दुसरीकडे पुरामुळे झालेली वाताहत. यातून मार्ग काढण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड योजना पुढे आली.

### २३ जुलै २०१७- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना

२०१२-१३ ते २०१५-१६ या चार वर्षात राज्यातील विविध भागात / जिल्ह्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे खरीप आणि रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी जाहीर करण्यात आली होती. तसेच २०१३-१४ आणि २०१४-१५ या वर्षात राज्याच्या काही भागात झालेल्या अवेळी पावसामुळे आणि गारीटीमुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसान झाले होते. परिणामी अनेक शेतकऱ्यांना बँकांकडून घेतलेले कर्ज फेडता आले नाही. त्यामुळे बँकांनी या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज देण्यास नकार दिला. यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती खूपच अवघड झाली. काही शेतकऱ्यांनी खासगी सावकारांकडून दुप्पट व्याजाने पैसे घेऊन पुन्हा एकदा आपले नशीब आजमावण्याचा प्रयत्न केला. पण तिथेही नशिबाने साथ न दिल्याने सावकाराचे कर्ज आणि व्याज वाढत गेले. यामुळे त्रस्त झालेल्या काही शेतकऱ्यांनी धीर सोडला आणि आत्महत्त्येचा मार्ग पत्करला. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मरण करून, रयतेचा पोशिंदा जिवंत राहावा, त्याने सन्मानाने कष्ट करून धान्य पिकवून रयतेचे पुन्हा सुखासमाधानाने पोट भरावे, यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७' जाहीर केली. या कर्जमाफीतून फडणवीस सरकारने राज्यातील जवळपास ४० लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय २४ जून २०१७ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला. या बैठकीत १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१६ या कालावधीत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करण्याचा निर्णय घेतला.

### योजनेतील ठळक बाबी

८९ लाख शेतकऱ्यांचे ३४ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ, दीड लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ, ४० लाख शेतकऱ्यांचा सात-बारा आता होणार कोरा, नियमित कर्ज फेडलेल्या शेतकऱ्यांना २५ हजारांपर्यंतचे अनुदान थेट बँकेत जमा, ३० जून २०१६ पर्यंतचे थकित कर्ज पूर्णपणे माफ, इन्स्टिट्यूशनल क्रेडिट सिस्टिमच्या बाहेर गेलेल्या शेतकऱ्याला दिलासा मिळाला.




# 'विकासाचा अजेय प्रवास'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली घडलेले नवे महाराष्ट्राचे स्वप्न

लेखक



**अजय बिवडे**
संपादक, दै. सिंहवाणी वृत्त

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात काही नेतृत्वे त्यांच्या निर्णयक्षमतेमुळे, दूरदृष्टीमुळे आणि विकासाभिमुख कार्यशैलीमुळे स्वतंत्र ओळख निर्माण करतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यापैकी एक महत्त्वाचे नाव आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळण्याचा मान त्यांना मिळाला आहे. २०१४ पासून त्यांनी राज्याच्या विकासाला नवे परिमाण देण्याचा प्रयत्न केला. प्रशासनातील पारदर्शकता, पायाभूत सुविधा, शेती, उद्योग, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या सर्व क्षेत्रांत त्यांनी सातत्याने काम केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने केवळ आर्थिक विकासाचा वेग वाढवला नाही, तर सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. विकास आणि लोककल्याण यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न त्यांच्या कारकीर्दीत स्पष्टपणे दिसून येतो.

### विकासाला नवी दिशा

२०१४ मध्ये मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर त्यांनी राज्यातील प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यावर भर दिला. शासनाच्या विविध सेवांचे डिजिटायझेशन, ऑनलाइन प्रक्रिया, ई-टेंडरिंग आणि ई-ऑफिस प्रणालीमुळे भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न झाला. नागरिकांना शासनाच्या सेवांचा लाभ अधिक वेगाने आणि सुलभ पद्धतीने मिळू लागला. राज्यातील मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देणे, उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि गुंतवणूक वाढविणे या दिशेनेही त्यांनी महत्त्वपूर्ण पावले उचलली.

### पायाभूत सुविधांचा वेगवान विस्तार

महाराष्ट्रातील रस्ते, पूल, मेट्रो, समृद्धी महामार्ग, किनारी महामार्ग, नागपूर मेट्रो, पुणे मेट्रो आणि विविध शहरांतील वाहतूक सुधारणा प्रकल्पांना त्यांच्या नेतृत्वाखाली मोठी चालना मिळाली. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा राज्याच्या आर्थिक विकासाचा कणा ठरणारा प्रकल्प मानला जातो. या महामागार्मुळे विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील संपर्क अधिक वेगवान झाला असून उद्योग, व्यापार आणि कृषी उत्पादनांच्या वाहतुकीला नवे बळ मिळाले.

### शेतीसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम

शेतकरी हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, ही भूमिका लक्षात घेऊन विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

जलयुक्त शिवार अभियान हे राज्यातील सर्वाधिक चर्चिले गेलेले जलसंधारण अभियान ठरले. गावागावांत जलसाठा निर्माण करणे, नाले खोल करणे, पाणलोट विकास आणि भूजल पातळी वाढविणे यामुळे अनेक भागांमध्ये पाण्याची उपलब्धता सुधारली.

त्याचबरोबर सिंचन प्रकल्पांना गती, कृषी उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पीक विमा योजनांचा विस्तार आणि शेतकऱ्यांसाठी विविध आर्थिक सवलती यांवरही भर देण्यात आला. कृषी क्षेत्रात मूल्यवर्धन, अन्नप्रक्रिया उद्योगांना चालना आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने विविध धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

### महिला सक्षमीकरणाची दिशा

महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी विविध योजना राबविण्यात आल्या. महिला बचत गटांना प्रोत्साहन, स्वयंरोजगार संधी, कौशल्य विकास प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि महिला उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम राबविण्यात आले. महिलांच्या सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाधारित उपाययोजना, हेल्पलाइन सेवा आणि कायदा-सुव्यवस्थेची अधिक प्रभावी अंमलबजावणी याकडे विशेष लक्ष देण्यात आले. महिला स्वावलंबन ही केवळ सामाजिक संकल्पना न राहता आर्थिक विकासाचा महत्त्वाचा भाग बनविण्याचा प्रयत्न त्यांच्या धोरणांतून दिसून येतो.

### सामाजिक न्याय आणि कल्याण

समाजातील वंचित, मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. शिष्यवृत्ती योजना, वसतिगृहे, कौशल्य विकास कार्यक्रम, रोजगार प्रशिक्षण, सामाजिक सुरक्षा योजना आणि थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांपर्यंत मदत अधिक पारदर्शक पद्धतीने पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### पर्यावरण संवर्धन

विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखणे ही आजची गरज आहे. वृक्षलागवड मोहिमा, नदी संवर्धन, जलसंधारण, प्लास्टिकविरोधी उपक्रम, हरित ऊर्जा आणि सौरऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यात आले. जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हवामान बदलाच्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी विविध पर्यावरणपूरक धोरणे आखण्यात आली.

### उद्योग आणि रोजगार

'मेक इन महाराष्ट्र' संकल्पनेला



बळ देण्यासाठी उद्योगांना सुलभ परवानग्या, गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण आणि औद्योगिक विकासाला चालना देणारी धोरणे राबविण्यात आली. देश-विदेशातील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आयोजित कार्यक्रमांमुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीचे प्रस्ताव आले. यामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळाली.

स्टार्टअप्स, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, उत्पादन क्षेत्र आणि सेवा उद्योगांना प्रोत्साहन देत महाराष्ट्राची औद्योगिक ओळख अधिक मजबूत करण्यात आली.

### शिक्षण आणि कौशल्य विकास

नव्या युगातील रोजगाराच्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य विकासाला महत्त्व देण्यात आले. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, डिजिटल सुविधा, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरूम आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही नवीन संधी उपलब्ध होऊ लागल्या.

### आरोग्य क्षेत्रातील प्रयत्न

आरोग्य सुविधांचा विस्तार, जिल्हा रुग्णालयांचे सक्षमीकरण, वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार, ग्रामीण आरोग्य सेवा आणि आपत्कालीन आरोग्य सुविधा मजबूत करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले. आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या वाढीसोबत आधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला.

### ग्रामीण विकास

ग्रामीण रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, ग्रामविकास, स्वच्छता आणि डिजिटल सुविधा यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती, स्वयंरोजगार आणि लघुउद्योगांना चालना देत ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या.

### शहरांचा आधुनिक विकास

मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबादसह विविध शहरांमध्ये स्मार्ट सिटी संकल्पना, मेट्रो रेल्वे, रस्ते विकास, जलनिस्सारण, सार्वजनिक वाहतूक आणि नागरी सुविधा सुधारण्यावर भर देण्यात आला. नागरीकरणाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक आणि शाश्वत शहर विकासासाठी विविध धोरणे राबविण्यात आली.

### प्रशासनातील पारदर्शकता

ऑनलाइन सेवा, ई-गव्हर्नन्स, डिजिटल व्यवहार, थेट लाभ हस्तांतरण आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि नागरिकाभिमुख करण्याचा प्रयत्न झाला. भ्रष्टाचारावर नियंत्रण, निर्णय प्रक्रियेला गती आणि नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण या बाबींना प्राधान्य देण्यात आले.

### सर्वसामान्यांसाठी विविध योजना

सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. घरकुल, पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा, शिक्षण, शेतकरी सहाय्य, महिला सक्षमीकरण, सामाजिक सुरक्षा, कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये सातत्याने प्रयत्न करण्यात आले. तंत्रज्ञानाचा वापर करून शासनाच्या योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यामुळे पारदर्शकता वाढली आणि मध्यस्थांची भूमिका कमी झाली.

### नेतृत्व वैशिष्ट्ये

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वशैलीत अभ्यासू वृत्ती, प्रशासनावरील पकड, निर्णयक्षमता, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर ही वैशिष्ट्ये अधोरेखित होतात. राज्यातील विविध भागांचा संतुलित विकास करण्याचा त्यांचा प्रयत्न अनेक प्रकल्पांतून दिसून येतो. राजकीय आव्हानांच्या काळातही प्रशासनाची गती कायम ठेवत विकासकामांना चालना देण्याचा प्रयत्न त्यांच्या कारकिर्दीत सातत्याने दिसून आला आहे.

महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रवासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे योगदान अनेक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण मानले जाते. पायाभूत सुविधा, शेती, उद्योग, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, शिक्षण, आरोग्य आणि डिजिटल प्रशासन या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी विकासाला गती देण्याचा प्रयत्न केला. सर्वाधिक काळ मुख्यमंत्री म्हणून कार्य करण्याचा बहुमान हा त्यांच्या राजकीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

भविष्यातील महाराष्ट्र अधिक सक्षम, आधुनिक, सर्वसमावेशक आणि आत्मनिर्भर करण्याच्या दिशेने त्यांनी मांडलेली विकासाची संकल्पना राज्याच्या प्रगतीच्या चर्चेत दीर्घकाळ स्मरणात राहील.

- ८६९८७८८६६६







# महाराष्ट्राच्या नेतृत्वाची 'हॅट्रिक'

लेखक



किशोर साहू
मौदा, जि. नागपूर

**५ डिसेंबर २०२४- महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा विराजमान**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये भाजपा वैयक्तिक १३२ जागा जिंकून राज्यातील सर्वांत मोठा पक्ष ठरला. तर महायुतीच्या माध्यमातून भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार) या तिन्ही पक्षांनी स्पष्ट बहुमत मिळवले. महायुतीतील सर्वांत मोठा पक्ष म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने प्रभावी प्रचार करून, पक्षाच्या संघटन कौशल्याचा खुबीने वापर करून मोठे यश मिळवले. शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागातील मतदारांचा विश्वास संपादन करण्यास देवेंद्र फडणवीस यशस्वी ठरले. ज्यामुळे महायुतीला बहुमत मिळाले तर भाजपाचे १३२ आमदार निवडून आले. त्यामुळे केंद्रीय नेतृत्वाने पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब करत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड केली.

**२३ जानेवारी २०२५- दावोस फोरममध्ये महाराष्ट्राची ऐतिहासिक परकीय गुंतवणूक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतातील ६ राज्यांचे प्रमुख दावोसमध्ये गुंतवणुकीसाठी आले होते. यामध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक अशी १५ लाख ७० हजार कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातून जवळपास १६ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचे बोलले जाते. या परिषदेत एकूण ६१ प्रकारचे करार झाले. त्यातील ५४ करार हे गुंतवणुकीचे आणि ७ करार हे स्ट्रॅटिजिक कॅटेगरीतले होते. स्ट्रॅटेजिक करारांमधून काही कंपन्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रोजेक्टसाठी नॉलेज, गाईड या भूमिकेतून मदत करणार आहे. यातून कोणत्याही प्रकारची थेट गुंतवणूक होणार नाही. तर जे ५४ करार झाले आहेत. त्यातील साधारण ९८ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात एफडीआय कम्पोनन्टमधून झालेली आहे. यामध्ये स्टील, आयटी, ग्रीन एनर्जी, इन्फ्रास्ट्रक्चर आदी सेक्टरमध्ये गुंतवणूक झालेली आहे. वेगवेगळ्या सेक्टरबरोबरच ही गुंतवणूक राज्याच्या वेगवेगळ्या भागात झालेली आहे. यामध्ये एमएमआरडीए क्षेत्रामध्ये ६ ते ७ लाख कोटी, विदर्भामध्ये ५ लाख कोटी, नॉर्थ महाराष्ट्र, नाशिकमध्ये ३० ते ३५ हजार कोटी, त्याचबरोबर मराठवाडा विभागामध्ये २५ ते ३० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. या ऐतिहासिक करारांमुळे दावोसमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचाचा बोलबाला असल्याचे दिसून आले. या अशा प्रकारच्या गुंतवणुकीमुळे राज्याची आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल होण्यास मदत होत आहे.

**२८ एप्रिल २०२५- लोकसेवा हक्क कायदाः पारदर्शक प्रशासनाची दशकपूर्ती!**

२८ एप्रिल २०१५ रोजी महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम हा क्रांतिकारी कायदा अंमलात आला आणि या कायद्याच्या अंमलबजावणीला २८ एप्रिल २०२५ रोजी एक दशक पूर्ण झाले. सरकारच्या कोणत्याही ऑफिसमधून वेळेत आणि पारदर्शकपणे सेवा मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार मिळवून देणारा हा कायदा महाराष्ट्राच्या प्रशासकीय इतिहासातील ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. या कायद्यामागे असलेली लोकभावना, सामाजिक दृष्टीकोन याची पाळेमुळे २०११ च्या अशासकीय विधेयकामध्ये आपल्याला दिसून येतात. हा कायदा जरी २०१५ मध्ये लागू झालेला असला तरी त्याची सुरूवात मात्र २०११ मध्ये एका अशासकीय विधेयकाच्या माध्यमातून झाली होती. ज्याचे रूपांतर अखेर कायद्यात झाले. या लोकसेवा हक्क कायद्याच्या प्रवासात आमदार आणि नंतर मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांची भूमिका अत्यंत मोलाची ठरली. लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीतून आपले सरकार वेबपोर्टल, ई-सेवा केंद्रे, मोबाईल ॲप्सचा वापर करत सुमारे १०२७ सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत; दहा वर्षातील हा बदलाचा प्रवास खूपच आश्वासक आणि प्रभावी ठरत आहे.

**१ मे २०२५- देवेंद्र फडणवीस सरकारचे १०० दिवस; लोकाभिमुखतेवर भर**

देवेंद्र फडणवीस यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला ऐतिहासिक असा १३२ जागांवर विजय मिळवून दिल्यानंतर त्यांची एकमताने मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. त्यानुसार ५ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. या शपथविधीनंतर मंत्रिमंडळाचा विस्तार करून खातेवाटप केले आणि त्याचसोबत त्यांनी आपल्या सरकारचा १०० दिवसांचा कृती कार्यक्रम जाहीर केला. या कृती कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी प्रत्येक विभागाला काही ठराविक उद्दिष्ट्ये दिली होती. त्याचबरोबर 'इज ऑफ लिव्हिंग'च्या अनुषंगाने प्रत्येक विभागाला ७ कलमी कृती कार्यक्रम आखून दिला होता. या उपक्रमात मंत्रालयातील सर्व ४८ विभाग, महापालिका आयुक्त, आयुक्त व संचालक, पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, पोलीस परीक्षेत्र, जिल्हापरिषद, विभागीय आयुक्त अशा सर्व प्रशासकीय यंत्रणा सहभागी झाल्या होत्या. त्यात महिला व बालविकास विभागाने ८० टक्के गुण मिळवून सर्वोत्तम विभागाचा मान मिळवला. तर चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाने ८४.२९ टक्के गुण मिळवून या कॅटेगरीत सर्वोत्तम येण्याचा बहुमान मिळवला. त्यानंतर उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त (८६.२९ टक्के), ठाणे जिल्हा परिषद (९२ टक्के) आणि मीरा-भाईंदर पोलीस आयुक्त (८४.५७ टक्के) कार्यालयाने आपल्या विभागांतर्गत सर्वोत्तम कामगिरी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा प्रशासकीय कार्यपद्धतीत गतिशीलता आणत लोकाभिमुख आणि उत्तरदायित्वपूर्ण प्रशासनाचा आदर्श घालून दिला आहे. या अभियानातून एक आदर्श कार्यसंस्कृती उभी करत, येणाऱ्या काळात नागरिकांच्या सेवेसाठी प्रशासन अधिक सजग, उत्तरदायी आणि गतिमान होऊन काम करेल, अशा विश्वास त्यांनी दिला आहे.

**५ जून २०२५- समृद्धी महामार्ग - नागपूर ते मुंबई ७०१ किमीचा संपूर्ण मार्ग खुला**

देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर ३१ जुलै २०१५ रोजी विधानसभेत नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस-वे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा केली होती. मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे प्रमाणेच नागपूर-मुंबई असा एक महामार्ग व्हावा, अशी कल्पना देवेंद्रजींच्या मनात २५ वर्षांपासून घोळत होती. ती त्यांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर २०१५ मध्ये प्रथमच अधिकृतरीत्या विधानसभेत घोषित केली होती. एमएसआरडीसी (महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ) अंतर्गत नागपूर ते मुंबई हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. या ७०१ किमी महामार्गासाठी एकूण ५५,३३५.३२ कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला. त्याचे ४ टप्प्यात लोकार्पण करण्यात आले. शेवटच्या इगतपुरी ते आमणे या ७६ किमीच्या टप्प्याचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ जून २०२५ रोजी झाले आणि ७०१ किमीचा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग संपूर्ण खुला झाला. देवेंद्र फडणवीस यांनी २५ वर्षांपूर्वी पाहिलेले मुंबई - नागपूर सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस-वेचे स्वप्नं १० वर्षात पूर्ण झाले. या महामार्गामुळे नागपूर ते मुंबई हा १६ तासांचा प्रवास आता फक्त ८ तासांत पूर्ण करता येणार आहे.

**४ मे २०२६- पश्चिम बंगाल, आसाममध्ये भाजपला बहुमत; राहुरी, बारामती पोटनिवडणुकीत महायुतीचा विक्रम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला घवघवीत यश मिळवून दिल्यानंतर, पक्षाने त्यांच्यावर पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाममधील विधानसभेच्या निवडणुकीसाठी स्टार कॅम्पेनर म्हणून जबाबदारी दिली होती. आसाम आणि केरळ राज्यात ९ एप्रिलला तर तमिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये अनुक्रमे २३ आणि २९ एप्रिलला निवडणुका झाल्या होत्या. या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल आणि आसामध्ये भारतीय जनता पक्षाला निर्विवाद असे यश मिळाले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीदरम्यान कोलकाता येथे रॅलीमध्ये सहभागी होऊन, पत्रकार परिषद घेऊन तिथल्या सरकारच्या आर्थिक धोरणावर आणि कायदा सुव्यवस्थेतील दिरंगाईवरून कडाडून टीका केली होती. तर आसाममध्ये सभा घेऊन तिथे भाजपा डबल इंजिन सरकारच्या मदतीने करत असलेल्या विकास कामांचे कौतुक केले होते. त्याचबरोबर तामिळनाडू, केरळ या राज्यांतील एनडीए घटक पक्षातील उमेदवारांच्या प्रचारसभेत आणि रोड शो मध्ये सक्रीय सहभाग घेतला होता. त्याचबरोबर राज्यातील राहुरी आणि बारामती पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय शिवाजीराव कार्डिले (१,१२,५८७) मतांनी तर महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार (२,१८,०३४) विक्रमी मतांनी विजयी झाले.




भारतीय जनता पार्टी
पश्चिम व दक्षिण-पश्चिम नागपूर आयोजित
सन्माननीय मुख्यमंत्री
मा. श्री. देवेन्द्रजी फडणवीस
यांच्या जन्मदिनानिमीत्त
श्री लक्ष्मी-नृसिंह महायज्ञ







कार्यक्रम



• महायज्ञ
दिनांक : 22 जुलै 2026
वेळ : सकाळी 8.30 ते सकाळी 11.30 पर्यंत

• महाआरती
वेळ : सकाळी 11.30 वाजता

• महाप्रसाद
महाआरतीनंतर लगेच

कार्यक्रमाचे स्थळ : श्री राम मंदिर क्रीडांगण, रामनगर चौक, नागपूर



संदिप जोशी - संयोजक
किसन गावंडे - सह-संयोजक
आशिष पाठक - सह-संयोजक
यश सातपुते - सह-संयोजक
संदीप जाधव - महामंत्री
रितेश गावंडे - महामंत्री
नरेश बरडे - शुभेच्छुक
विश्वास गोसेवाडे - शुभेच्छुक

आयोजन समिती : पश्चिम नागपुर : विनय दाणी, विनोद बघेल, अमर खोडे, सुधीर कपूर, विशाल वानखेडे, विनोद नायडू, शिल्पा मोटघरे, कमलेश पांडे, सुमित गुप्ता, अनिल बाहे, सतिश वडे, धर्मेन्द्र देशमुख, नितीन (बबलु) बक्सारिया, कल्पना पझारे, सुनिल उईके, मयंक चितमलवार, सुरेशचंद्र गुप्ता, रेखा दैने, आकाश मडावी, अमित पाठक, अनंत जगनित, सुचित्रा नशिने, स्वप्निल खडगी, नवनीत श्रीवास्तव, विजय ढोके, निखील कश्यप, हरिश दादु सोमलवार, शशिकांत बोदड, बंटी दिक्षीत, राजश्री विश्वास, नविन जैन (पुगलिया), राजेश्वर सिंग, मनोज केसरवानी, रजत फातोडे, अमोल बढिये, सागर घाटोळे, सुनिल तांबे, शिला मोहोड, स्वप्निल वंजारी, रोशन रहाटे, दिपक इंगळे, भरत अग्रवाल, शैलेंद्र वाजपेयी, संजय गर्ग, रूपेश मुदलियार, वर्षा जोसेफ, जयराज पोतराज, सचिन सहानी, जयहरीसिंग ठाकूर, प्रशांत कुमरे, लक्ष्मीकांत दादुरिया, अजय करोसिया, अरूण मोगरकर, नितु अतकुलवार, अरविंद बंसाली, शशिकांत हरडे, वैशाली फरकांडे. आयोजन समिती : दक्षिण-पश्चिम नागपुर : दिलीप दिवे, महेन्द्र भुगांवकर, ईश्वर ढेंगळे, विनोद शिंदे, गोपाल बोहरे, विमलकुमार श्रीवास्तव, सतिश सिरसवान, शरद बांते, संजय सिन्हा, पारेंद्र पटले, निलेश राऊत, श्रावण फरकाडे, शालिक कडू, दत्तात्रय भुसारी, सचिन जाधव, गिरीश श्रीरामे, संदिप मानकर, शंतनू येरपुडे, गिरीश सबळ, गोलु बोरकर, दयाराम भोतमांगे, सुमित सोनडवले, अनुसया गुप्ता, मंजूषा भूरे, सपना हिरणवार, मंगलाबेन पटेल, अंजली देशपांडे, नूतन शेंदूर्निकर, अनिता शर्मा, करुणा जयस्वाल, स्वाती फडणीस, वैशाली सोनुले, मनिषा खडसे, पुजा भोयर, महादेव तायवाडे, रणजित आडे, डॉ. अशोक पाटील, श्याम कालेंकर, शेखर पिकलमुंडे, जगदीश जोशी, नरेश धनवंत, रोहित बढ़ेल, मनिष जैन, दिलीप तुपकर, मंगेश झाडे, सचिन लिमसे, मंगेश मोरे, मुन्ना नेताम, किशोर लेकुरवाळे, चंद्रकांत मेश्राम, विपीन खिरटकर, निखील गौळकर, अमोल ठोंबरे, जितेंद्र टिचकुले, राजेश हिगणकर, श्रावण काळे, ललित मडावी, बजरंग खापेकर, विनोद चावला, चंद्रकांत येसकर, अभिलाल देशमुख, अमित मुदलीयार, मंगल लोंढे, सतिश शाहू, योगेश काटे, मधुरम छांगाणी, बिट्टु चव्हाण, मुकूंद जोशी.

वाहन पार्कींग व्यवस्था- श्री राम मंदिराचे मागील संघ मैदान, रामनगर, नागपूर

• सिध्दारुढ मंदिर • पश्चिम नागपूर नागरिक संघ • नरवीर बाजीप्रभु देशपांडे कृती समिती • स्वामी जनार्दन योग्याभ्यासी मंडळ • श्री सिध्दीविनायक गणपती मंदिर, झिल्पी मोहगांव • श्रीराम मंदिर रामनगर आणि हनुमान मंदिर रामनगर चौक